सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २२ जुलै २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ९९ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com









सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# वेरूळ रस्त्याअभावी शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू; प्रशासनासह लोकप्रतिनिधींचेही दुर्लक्ष महिनाभरातील दुसरी घटना

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी वेरूळ गाव पर्यटन क्षेत्र म्हणून जगाच्या नकाशावर नावाजलेले असून गावाच्या आजूबाजूची परिस्थिती विकासात्मक बाब म्हणून अत्यंत बिकट आहे यात स्थानिक लोकप्रतिनिधींचे अक्षयमय दुर्लक्ष असल्याचे दिसून येते.



वेरूळ शिवारातील इंडियन ऑइल पेट्रोल पंपाच्या मागील बाजूस असलेल्या काळे वस्तीवरील शेतकरी सखाराम किसन जाधव यांचा वेळेत वैद्यकीय उपचार न मिळाल्याने रविवारी (दि. १९ जुलै २०२६) दुपारच्या सुमारास दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये प्रशासनाविरोधात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सखाराम जाधव हे आपल्या कुटुंबासह काळे वस्ती परिसरातील शेतात वास्तव्यास होते. अनेक वर्षांपासून या भागात सर्व हंगामात वाहतुकीयोग्य रस्ता नसल्याने येथील शेतकरी व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रविवारी त्यांची प्रकृती अचानक बिघडल्याने कुटुंबीयांनी तातडीने रुग्णवाहिका बोलावली. मात्र रस्ता नसल्याने ॲम्बुलन्स घटनास्थळी पोहोचू शकली नाही. अखेर त्यांना बैलगाडीतून सुमारे दोन किलोमीटर अंतरापर्यंत आणण्यात आले. मात्र या विलंबातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ही पहिली घटना नाही. सुमारे महिनाभरापूर्वीही अशाच परिस्थितीत एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला होता. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून तातडीने कायमस्वरूपी रस्ता करण्याची मागणी होत आहे.

रस्ता नसल्याने नागरिकांचे हाल

- शेतकऱ्यांना पिकवलेला शेतमाल वेळेवर बाजारपेठेत नेता येत नाही. - गर्भवती महिला, वृद्ध नागरिक व गंभीर रुग्णांना वेळेवर वैद्यकीय उपचार मिळत नाहीत. - रुग्णवाहिका वस्तीपर्यंत पोहोचू शकत नाही. - शाळकरी विद्यार्थ्यांना चिखल व कच्च्या रस्त्यावरून जीव धोक्यात घालून शाळेत जावे लागते. - शेतकरी, शेतमजूर व महिलांना दैनंदिन कामांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. - पावसाळ्यात संपूर्ण वस्तीचा संपर्क तुटण्याची वेळ येते.

काळे वस्तीवरील नागरिकांनी तहसीलदार व जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने सर्व हंगामात वाहतुकीयोग्य रस्ता मंजूर करून काम सुरु करण्याची मागणी केली असून, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

"माझ्या वडिलांची प्रकृती अचानक बिघडली. आम्ही तातडीने ॲम्बुलन्सला फोन केला, पण रस्ता नसल्यामुळे ॲम्बुलन्स आमच्या शेतापर्यंत पोहोचू शकली नाही. नाईलाजाने बैलगाडीतून त्यांना बाहेर आणावे लागले. जर रस्ता असता तर माझ्या वडिलांचा जीव वाचला असता. आम्हाला कोणतीही मदत नको, पण या भागातील शेतकऱ्यांसाठी कायमस्वरूपी रस्ता करून द्या. आमच्या कुटुंबासारखी वेळ दुसऱ्या कोणावरही येऊ नये."

बाळू सखाराम जाधव
(मृत शेतकरी सखाराम जाधव यांचे पुत्र)

"आम्ही अनेक वर्षांपासून रस्त्याची मागणी करत आहोत. पावसाळ्यात शेतात जाणेही कठीण होते. शेतमाल बाजारात नेता येत नाही. गर्भवती महिला, वृद्ध, लहान मुले आणि आजारी रुग्णांचे प्रचंड हाल होतात. विद्यार्थ्यांना रोज जीव धोक्यात घालून शाळेत जावे लागते. दोन शेतकऱ्यांचे जीव गेल्यानंतरही प्रशासन जागे होत नसेल, तर यापेक्षा मोठे दुर्दैव कोणते?"

वाल्मीक काळे (शेतकरी, काळे वस्ती)

"हा केवळ एका शेतकऱ्याचा मृत्यू नाही, तर ग्रामीण भागाकडे झालेल्या प्रशासनाच्या दुर्लक्षाचा परिणाम आहे. रस्त्याअभावी दोन शेतकऱ्यांचे जीव गेले, तरी प्रशासनाने कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. आज शेतकरी शेतमाल विकू शकत नाही, विद्यार्थ्यांना शाळेत जाता येत नाही, गर्भवती महिला आणि वृद्धांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. नागरिकांना अजून किती जीव गमवावे लागणार? प्रशासनाने तातडीने रस्ता मंजूर करून काम सुरू करावे; अन्यथा शेतकरी, ग्रामस्थ आणि सामाजिक संघटनांसह तीव्र लोकआंदोलन छेडण्यात येईल."

-सामाजिक कार्यकर्ते सतीश लोखंडे

## अनधिकृत वैद्यकीय व्यवसायप्रकरणी मुक्तानंद गिरी महाराजांविरुद्ध गुन्हा दाखल

### 24 जूनच्या छाप्यानंतर कन्नड ग्रामीण पोलिसांत फिर्याद

तभा वृत्तसेवा

**कन्नड- दि. २० जुलै** : मुंगसापूर (जेहूर) येथील आश्रमात अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय केल्याचा ठपका ठेवत मुक्तानंद गिरी महाराज यांच्याविरुद्ध कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ जून रोजी अन्न व औषध प्रशासन व तालुका स्तरीय पथकाने आश्रमावर छापा टाकून रुग्णांची नोंद असलेली रजिस्टर, वही आणि औषधाची बाटली जप्त केली होती. त्या कारवाईनंतर संबंधितांकडून वैद्यकीय व्यवसायाचा परवाना किंवा शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे सादर करण्यात न आल्याने ही फिर्याद दाखल करण्यात आली.

प्राथमिक आरोग्य केंद्र, हतनूर येथील वैद्यकीय अधिकारी तथा प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप कांबळे यांनी कन्नड ग्रामीण पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार, जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार अनधिकृत वैद्यकीय व्यवसायाविरोधात मोहीम राबविण्यात येत आहे. मुंगसापूर (जेहूर) येथील मुक्तानंद गिरी महाराज हे विविध आजारांवर उपचार करून पैसे घेत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या.

त्यानुसार २४ जून रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह तालुका स्तरीय पथकाने आश्रमावर छापा टाकला. यावेळी रुग्णांची नावे, पत्ते, मोबाईल क्रमांक, आजार व शुल्काच्या नोंदी असलेले चार रजिस्टर, एक वही तसेच 'महामंडलेश्वर हर्बल एस.एस.' लेबल असलेली औषधाची बाटली जप्त करण्यात आली. औषधाचा नमुना तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासनाकडे पाठविण्यात आला असून त्याचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

त्यानंतर संबंधितांना १ व ७ जुलै रोजी नोटिसा बजावून वैद्यकीय व्यवसायाचा परवाना व शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे सादर करण्यास सांगण्यात आले. मात्र, कोणतीही वैध कागदपत्रे सादर करण्यात आली नसल्याचा उल्लेख फिर्यादीत आहे.

गटविकास अधिकारी तथा तालुका स्तरीय अनधिकृत वैद्यकीय व्यवसाय शोध मोहीम समितीच्या अध्यक्षांच्या निर्देशानुसार २० जुलै रोजी डॉ. कांबळे यांनी कन्नड ग्रामीण पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली त्यानुसार ग्रामीण पोलिसांनी मुक्तानंद गिरी महाराज यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## दीड वर्षांच्या बालीकेवर मेडिकवर हॉस्पिटलमध्ये यशस्वी कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया



**छत्रपती संभाजीनगर** : राष्ट्रीय बाल सुरक्षा योजनेअंतर्गत (RBSK) जन्मजात श्रवणदोष असलेल्या दीड वर्षांच्या बालीकेवर मेडिकवर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. या शस्त्रक्रियेमुळे बालकाला ऐकण्याची आणि पुढील काळात बोलण्याची क्षमता विकसित होण्यास मोठी मदत होणार आहे. शासनाच्या राष्ट्रीय बाल सुरक्षा योजनेमुळे ही अत्याधुनिक आणि खर्चिक शस्त्रक्रिया लाभार्थी बालकाला विनामूल्य उपलब्ध झाली.

या प्रसंगी सिव्हिल सर्जन डॉ. कमलाकर मुदखेडकर आणि आरबीएसकेचे नोडल अधिकारी डॉ. प्रशांत बडे यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉ. अतुल पोरे, डॉ. रितेश भाग्यवंत, डॉ शरद शेळके आणि भूल तज्ञ डॉ. सुनील मुरके यांचे अभिनंदन करत राष्ट्रीय बाल सुरक्षा योजनेअंतर्गत बालकांना अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल मेडिकवर हॉस्पिटलच्या कार्याचे कौतुक केले.

मेडिकवर हॉस्पिटलचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी सांगितले, "जन्मजात श्रवणदोषाचे निदान लवकर होऊन योग्य वयात कोक्लिअर इम्प्लांट शस्त्रक्रिया केल्यास बालकाची ऐकण्याची व बोलण्याची क्षमता चांगल्या प्रकारे विकसित होऊ शकते. राष्ट्रीय बाल सुरक्षा योजनेमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलांनाही जागतिक दर्जाची उपचार सुविधा उपलब्ध होत आहे. भविष्यातही अशा गरजू बालकांना सर्वोत्तम उपचार देण्यासाठी मेडिकवर हॉस्पिटल

## अभ्यास, निर्णयक्षमता आणि विकासाचा ध्यास – देवेंद्रजींच्या नेतृत्वाचा माझा अनुभव

२२ जुलै हा महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस. या निमित्ताने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त करताना त्यांच्या सहवासात काम करताना आलेल्या अनेक आठवणी डोळ्यांसमोर उभ्या राहतात. सार्वजनिक जीवनात अनेक नेत्यांसोबत काम करण्याची संधी मिळाली; मात्र अभ्यास, निर्णयक्षमता, कामाचा अफाट वेग आणि संकटातही शांत राहण्याची वृत्ती या गुणांमुळे देवेंद्रजी वेगळे ठरतात.

सन २०१४ मध्ये देवेंद्रजी मुख्यमंत्री झाल्यानंतर मी देशातील सर्वात मोठ्या बंदरांपैकी एक असलेल्या जेएनपीटीचा विश्वस्त (ट्रस्टी) होतो. त्या काळात जालना येथे ड्राय पोर्ट उभारण्याची मागणी मी आणि श्री. राम भोगले यांनी केली होती. या प्रकल्पामुळे मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला नवी दिशा मिळणार होती. आमची भूमिका समजून घेत तत्कालीन केंद्रीय मंत्री मा. नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, अवघ्या काही काळात सुमारे २५० हेक्टर जमीन संपादित करून हा महत्त्वाचा निर्णय मार्गी लावण्यात आला. प्रशासनाकडून इतक्या वेगाने आणि परिणामकारक पद्धतीने निर्णय होताना मी प्रथमच अनुभवत होतो. आजही तो प्रसंग माझ्या स्मरणात ताजा आहे.

मुख्यमंत्री झाल्यानंतरच्या त्यांच्या पहिल्या जपान दौऱ्यात सहभागी होण्याची संधी मला मिळाली. त्या दौऱ्यात त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीने मी अक्षरशः भारावून गेलो. विमानप्रवासादरम्यान अनेक उद्योगपती त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी उत्सुक होते. एकामागून एक उद्योगपती त्यांच्यासमोर आपले प्रश्न, कल्पना आणि प्रस्ताव मांडत होते. संपूर्ण रात्र जवळपास त्यांनी विश्रांती न घेता चर्चा केल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजताच्या बैठकीला मात्र ते आमच्या आधी उपस्थित होते. त्यांचा कामाचा उत्साह, वेळेचे नियोजन आणि अफाट ऊर्जा पाहून प्रत्येकालाच आश्चर्य वाटत होते.



देवेंद्रजींचा आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे संकटाच्या काळातही संयम न सोडणे. राजकारणात अनेक प्रसंगी तणावाची परिस्थिती निर्माण होते; परंतु त्यांनी कधीही भावनेच्या भरात निर्णय घेतल्याचे मला जाणवले नाही. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या काळात राज्यात विविध प्रकारच्या चर्चा सुरू होत्या. अनेक तर्क-वितर्क लावले जात होते. त्या वेळी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री म्हणून त्यांनी कोणतीही अनावश्यक प्रतिक्रिया न देता अत्यंत शांतपणे आणि संयमाने परिस्थिती हाताळली. त्यांच्या या भूमिकेचे सर्व स्तरांतून कौतुक झाले.

माझ्या अनुभवात देवेंद्रजींचा आणखी एक विशेष गुण म्हणजे प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास. कोणताही विषय त्यांच्या समोर आला की त्यामागील सर्व पैलू समजून घेतल्याशिवाय ते निर्णय घेत नाहीत. केवळ समस्या ऐकून न घेता त्यावर व्यवहार्य आणि दीर्घकालीन उपाय शोधण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे प्रशासनातही त्यांच्या निर्णयांबाबत विश्वासाचे वातावरण निर्माण होते.

आज महाराष्ट्र देशातील सर्वाधिक वेगाने विकसित होणाऱ्या राज्यांपैकी एक आहे. उद्योग, पायाभूत सुविधा, द्रुतगती महामार्ग, बंदरे, गुंतवणूक, शिक्षण, आरोग्य आणि आधुनिक तंत्रज्ञान या सर्व क्षेत्रांमध्ये राज्याने मोठी झेप घेतली आहे. विकसित भारत २०४७ या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेशी सुसंगत असे विकसित महाराष्ट्राचे व्हिजन देवेंद्रजी सातत्याने मांडत आहेत. रेल्वे, रस्ते, लॉजिस्टिक्स, मेडिकल कॉलेजेस, औद्योगिक कॉरिडॉर आणि आधुनिक पायाभूत सुविधांच्या माध्यमातून महाराष्ट्राला जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविण्याचा त्यांचा प्रयत्न निश्चितच भविष्यात राज्याला अधिक उंचीवर घेऊन जाईल, असा मला विश्वास आहे.

आज महाराष्ट्राच्या विकासात देवेंद्र फडणवीस यांचे योगदान महत्त्वाचे आहे. पद मोठे असते म्हणून नेता मोठा होत नाही; तर दूरदृष्टी, अभ्यास, निर्णयक्षमता, कार्यतत्परता आणि जनतेप्रती असलेली बांधिलकी यामुळे नेतृत्व मोठे ठरते. या सर्व गुणांचा सुंदर संगम देवेंद्रजींच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो.

मा. देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा! त्यांना निरोगी, दीर्घायुष्य लाभो आणि त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र विकासाच्या नव्या शिखरांकडे वाटचाल करत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**– विवेक देशपांडे**
**चेअरमन, रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लि. छत्रपती संभाजीनगर**

# दादांविना राजकारण नीरस...

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री नामदार अजितदादा पवार हे नावाप्रमाणेच आम्हा सर्वांचे खऱ्या अर्थाने दादा होते. एक मित्र, एक भाऊ, एक नेता अशा विविध रूपांमध्ये आम्ही सर्वांनीच त्यांना अनुभवले आहे. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्र एका चांगल्या प्रशासकाला व जनतेविषयी प्रचंड आस्था आणि तळमळ असलेल्या एका दूरदृष्टी असणाऱ्या प्रगल्भ नेत्याला कायमचा मुकला आहे. सर्वच महाराष्ट्रावर हा आघातच इतका प्रचंड आहे की, या दुःखातून आपल्यासारखे कार्यकर्ते सावरूच शकत नाहीत.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नामदार अजितदादा पवार यांचे निधन ही माझ्या आजवरच्या राजकीय आयुष्यातील सर्वांत वेदनादायी घटना आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ महाराष्ट्राच्या राजकारणात आम्ही एकत्रितपणे वाटचाल करत आलो. दादांच्या झंझावाताने राज्याच्या राजकारणाला नवी दिशा दिली. हजारो कार्यकर्त्यांना दादांनी पाठबळ दिले. आमच्यासारख्या अनेक नेत्यांना सोबत घेऊन राज्याच्या विकासाचा गाडा तडफेने पुढे नेला. आपल्या अभ्यासपूर्ण, काम आणि शिस्तबद्ध कार्यशैलीने दादांनी एक अवीट ठसा राज्याच्या राजकारण, समाजकारणावर उमटवला आहे. दादांनी केवळ राजकीय वारसा चालवला नाही, तर आपल्या धडाडीच्या कार्यातून तो अधिक बळकट केला. आदरणीय शरद पवारसाहेबांसारख्या कर्तृत्ववान नेत्यांचा वारसा लाभला असला तरीही केवळ त्या आधारावरच त्यांनी आपली वाटचाल केली नाही. प्रत्येक टप्प्यावर आपल्या कार्यकर्तृत्वाचा आणि कामगिरीचा ठसा उमटवत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली.

महायुतीच्या सरकारमध्ये अजितदादांचं स्थान अत्यंत महत्त्वाचं होतं. गेल्या २५ वर्षांत उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, जलसंपदा मंत्री या महत्त्वाच्या खात्यांमध्ये काम करताना जनतेच्या गरजा लक्षात घेऊन दादांनी अनेक दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले. त्यांच्या कार्यपद्धतीत वेग, अचूकता आणि शिस्त या तीन गोष्टी विशेषपणे जाणवत. कोणत्याही प्रकरणाचा खोलवर अभ्यास करून, त्याचे फायदे-तोटे समजून घेतल्याशिवाय ते निर्णय घेत नसत. कामात गती, निर्णयात स्पष्टता आणि अंमलबजावणीत काटेकोरपणा हे त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य राहिले.

अजितदादांचा सहकार क्षेत्रातला अनुभव दांडगा होता. त्यांनी पुणे जिल्ह्यात बारामतीच्या विकासातून एक मॉडेल उभं केलं. या भागात त्यांनी शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, उद्योग अशा अनेक क्षेत्रांचा विकास साधला. त्यांच्या कार्यामुळे बारामतीचा विकास हा आज ग्रामीण भागातील एक 'आदर्श' मानला जातो.

राज्याच्या राजकारणात, समाजकारणात, अर्थकारणात, शैक्षणिक क्षेत्रात, क्रीडाक्षेत्रात त्यांच्या दूरदृष्टीचं मोठं योगदान राहिलं. राज्याच्या विकासासाठी महायुती सरकारची वाटचाल अत्यंत वेगाने, जोमाने आणि एकजुटीने सुरू आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या मिशनमध्ये आम्ही सर्वजण झपाट्याने कार्यरत आहोत. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था वन ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आमच्या सरकारने ठेवले असून त्यादृष्टीने अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री म्हणून अजितदादांनी अनेक नव्या संकल्पांची, योजनांची आखणी सुरू केली होती. असे असताना एकाएकी दादा हा सर्व डाव अर्ध्यावर सोडून गेले आहेत.

अर्थसंकल्प आणि अजितदादा हे एक समीकरणच बनले होते. गतवर्षाच्या अर्थसंकल्पातून त्यांनी या व्हिजनला अनुसरून अत्यंत कौशल्यपूर्ण नियोजन करून समाजातील सर्व घटकांना न्याय व विकासाच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. 'लाडकी बहीण योजना' ही महायुती सरकारचा मानबिंदू ठरली. दादांनी या योजनेचे महत्त्व आणि दूरगामी सकारात्मक परिणाम लक्षात घेऊन अतिशय उत्स्फूर्तपणे यासाठी वित्तीय तरतूद केली. त्यामुळे राज्यातील लाखो माता-भगिनींना दरमहा हक्काचा मासिक आधार मिळत आहे. या योजनेमुळे अजितदादांचे काम होते. सुरुवातीला राज्यात ही योजना दोन महिन्यांमध्ये बंद होऊन जाईल, असे विरोधक म्हणत होते. बहिणींनी खात्यात आलेले पैसे लवकरात लवकर काढून घ्यावे, असेही सांगत होते. पण अडीच कोटी महिलांच्या खात्यात पाच महिन्यांचे पैसे निवडणुकीआधी जमा झाले होते. यासंदर्भात कुठलीही तक्रार नव्हती. आम्ही कुठल्याही गावात गेलो की सर्वांना पैसे मिळाले, असे सांगायचे. सगळे जण तिजोरी रिकामी असून पैसे कुठून येणार? असे म्हणत होते. अनेक लोक दिल्लीलाही शंका वाटायचे. पण अजितदादा हे भारतामध्ये सर्वात 'कंजूस' अर्थमंत्री होते. जे पैसे जिथे पोहोचायचे आहेत तिथे पोहोचवायचे काम अजितदादा अचूकपणे करत. यशस्वी अर्थमंत्री म्हणून त्यांची कारकीर्द महाराष्ट्राला सदैव स्मरणात राहील.



दादांच्या अर्थमंत्री पदाच्या काळात महायुती सरकारने नैसर्गिक आपत्तीपोटी १५ हजार कोटी रुपये दिले. अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी दोन हजार कोटी दिले. गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र राज्याची सरकारी नोकर भरती विविध कारणांनी अडकली होती. ही कोंडी दादांनी फोडली. राज्य सरकारने युवा कौशल्य प्रशिक्षण विद्यावेतन योजना, वृद्धांना तीर्थक्षेत्र योजनेंतर्गत वयोश्री योजना लागू केली. महिला बचत गटांना लखपती दीदी योजनेमध्ये रक्कम १० लाखांवरून २५ लाख केली. व्यवसाय करू इच्छिणाऱ्या महिलांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्टार्टअप योजना बिनव्याजी सुरू केली. शेतकऱ्यांसाठी साडेसात अश्वशक्तीपर्यंत मोफत वीज, एक रुपयात पीकविमा, शेतकऱ्यांना अपघाती मृत्यूसाठी दोन लाखांची भरपाई विमा योजना, गाय दूधामध्ये लिटरला पाच रुपये अनुदान, मागेल त्याला सौरऊर्जा पंप, शेतकरी सन्मान योजना, कुटुंबाला तीन सिलेंडर मोफत अशा महत्त्वाकांक्षी योजना दादांच्या अर्थमंत्रीपदाच्या काळात राज्य सरकारने सुरू केल्या आणि आजही राज्यातील हजारो लाखो जण या योजनांचा लाभ घेत आहेत.

अर्थमंत्री म्हणून दादांनी महिला, युवक, शेतकरी, कामगार यांच्या उन्नतीसाठी त्यांनी अनेक सकारात्मक निर्णय घेतले. पण त्याचा गाजावाजा केला नाही.

तळागाळातील लोकांना आधार देऊन राज्याचा सर्वांगीण आर्थिक विकास करणे हे आपले कर्तव्य आहे, या हेतूने दादा कार्यरत असत. दादांच्या बोलण्यात नेहमी स्पष्टता असायची. वागण्यात खात्रीशीरपणा असायचा आणि कामाचा आग्रह सदैव दिसून येत असे. त्यांना अगदी छोट्या-छोट्या तपशीलांकडे लक्ष द्यायची सवय होती. प्रत्येक योजनेच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी वेळोवेळी प्रशासनाला खडसावून प्रश्न विचारले. त्यामुळे प्रशासनावर दादांचा आदरयुक्त वचक होता.

एक प्रसंग मला आवर्जून सांगावासा वाटतो. कोल्हापूर जिल्ह्याचा उपजिल्हा म्हणून ओळख असलेल्या गडहिंग्लज शहराला प्रशासकीय इमारतीची फार मोठी गरज होती. परंतु, १९६० पासून जागेचा प्रश्न भिजत पडला होता. मध्यंतरी, मुंबईत मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा प्रश्न निकालात निघाला. गडहिंग्लज शहरात आजरा रस्त्यावर मध्यवर्ती ठिकाणी पशुसंवर्धन विभागाची १२२ गुंठे जागा आहे. त्यापैकी ४७ गुंठे जागा पशुसंवर्धन विभागाला ठेवून उर्वरित ७५ गुंठे जागेवर प्रशासकीय भवन बांधकामाचे आरक्षण होते. मुंबईतील बैठकीत ही जागा प्रशासकीय भवनाच्या बांधकामासाठी देण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले. अशा अनेक विकासाभिमुख मुद्यांची, प्रश्नांची सोडवणूक दादांनी स्वतः लक्ष घालून केली.

क्रीडा, सहकार, शिक्षण, सामाजिक क्षेत्रातही अजितदादांनी आपली वेगळी छाप उमटवली. महाराष्ट्र खो-खो असोसिएशन, कबड्डी असोसिएशन यांसारख्या संस्थांना त्यांनी नवसंजीवनी दिली. या खेळांमध्ये नव्या पिढीला संधी मिळावी, ग्रामीण भागातील युवक पुढे यावा यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांचे संवेदनशील मन अनेक प्रसंगी दिसून आले आहे. सामान्य माणसाच्या गरजा ओळखून त्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करणे, एखाद्या गरीब, गरजू व्यक्तीच्या मदतीस धावून जाणे हा त्यांच्या स्वभावाचा एक भाग होता. त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या शहरी व ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण झाल्या, जलसंपदा प्रकल्प उभे राहिले, सिंचनासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना नेहमी प्राधान्य दिले. त्यामुळेच दादांच्या निधनाने महाराष्ट्रातील नागरिक, प्रशासन, उद्योग, व्यापारी वर्ग आणि शेतकरी वर्ग, महिला भगिनी, क्रीडापटू, लेखक, पत्रकार या सर्वांच्या डोळ्यांत अश्रू तरळले. अनेकांच्या अश्रूंचा बांध फुटला. दादांविषयीची ही कणव, आपुलकी, माया दुर्मिळपणे राजकारणात पाहायला मिळते. अजितदादा लोकनेता होते. त्यांनी महाराष्ट्राला वळण दिले, जनतेच्या हितासाठी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आणि महाराष्ट्राला आर्थिकदृष्ट्या प्रगत बनवण्याचा ध्यास घेतला. त्या दिशेने वेगाने पावले टाकली; पण हा प्रवास अर्ध्यावर असतानाच नियतीने डाव साधला. कधीही भरून न येणारी पोकळी दादांच्या जाण्याने राजकारणात तयार झाली आहे. दादांविना महाराष्ट्राचे राजकारण नीरस होऊन जाईल.

**- नामदार हसन मुश्रीफ**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

बोंदरगाव येथे १२५ एकरांवरील सोयाबीन जोमदार

# दुष्काळी परिस्थितीत बीबीएफ तंत्रज्ञान ठरले प्रभावी

**सोनपेठ,/प्रतिनिधी:-** यावर्षी अल निनोच्या प्रभावामुळे पावसात मोठा खंड पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तविली होती. या पार्श्वभूमीवर जिल्हा कृषी विभागाने खरीप हंगामापूर्वीच शेतकऱ्यांमध्ये ( ) तंत्रज्ञानाची व्यापक जनजागृती केली. या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम म्हणून बोंदरगाव (ता. सोनपेठ) येथे सुमारे १२५ एकर क्षेत्रावर पद्धतीने सोयाबीनची पेरणी करण्यात आली. सध्या परिसरात अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झालेला असतानाही हे पीक हिरवेगार, निरोगी आणि जोमदार वाढत असल्याचे दिसून येत आहे. म्हणजे अर्थात रुंद वाफा आणि सरी तयार करून त्यावर पेरणी करण्याची आधुनिक व वैज्ञानिक पद्धत. या पद्धतीत ९०-१२० सें.मी. रुंद वाफ्यांवर पेरणी केली जाते आणि त्यामध्ये सरी तयार केल्या जातात. यामुळे पिकाच्या मुळांना दीर्घकाळ ओलावा उपलब्ध राहतो. कमी पाऊस झाल्यास वाफ्यातील ओलावा टिकून राहतो, तर अतिवृष्टी झाल्यास अतिरिक्त पाणी सरीतून बाहेर निघून जाते. त्यामुळे पाणी साचण्याची समस्या उद्भवत नाही.

तंत्रज्ञानाचे प्रमुख फायदे कमी पावसातही जमिनीतील ओलावा दीर्घकाळ टिकतो.अतिवृष्टीत अतिरिक्त पाण्याचा जलद निचरा होतो.मुळांची चांगली वाढ होऊन पीक अधिक मजबूत व निरोगी राहते.हवेची खेळती उपलब्धतेमुळे पीक जोमदार वाढते.तण नियंत्रण, खते व कीटकनाशकांची फवारणी सोयीस्कर होते.जमिनीची धूप रोखली जाते.पाण्याचा कार्यक्षम वापर होऊन उत्पादन वाढण्यास मदत होते.हवामान बदलाच्या अनिश्चित परिस्थितीतही पीक टिकून राहण्याची क्षमता वाढते. सोनपेठ कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी सातत्याने संपर्क साधून, प्रात्यक्षिके, शेतभेटी, तंत्रज्ञानाचे महत्त्व पटवून दिले. यामुळे बोंदरगावसह परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी या तंत्रज्ञानाचा स्वीकार केला. सध्याच्या कमी पावसाच्या परिस्थितीत पद्धतीने पेरलेले सोयाबीन शेत पारंपरिक पद्धतीच्या शेतांपेक्षा अधिक चांगल्या अवस्थेत असल्याचे शेतकरी आणि अधिकारी यांनी सांगितले. या यशस्वी उपक्रमामागे तालुका कृषी अधिकारी प्रियांका कावरे यांचे नियोजन आणि मार्गदर्शन, मंडळ कृषी अधिकारी गायकवाड यांचे क्षेत्रीय सहकार्य, उपकृषी अधिकारी दिनकर नागरगोजे आणि गावचे सहायक कृषी अधिकारी शिनगारे बालासाहेब यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न लाभले. याशिवाय ट्रॅक्टर मालक श्रीकृष्ण सपकाळ यांनी विशेष सहकार्य केले. हवामान बदल, अल निनो आणि अनियमित पावसाच्या पार्श्वभूमीवर हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी एक प्रभावी आणि किफायतशीर पर्याय ठरू शकते. जिल्हा कृषी विभागाने सर्व शेतकऱ्यांना या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले आहे.





# दोन लाख पंधरा हजार रुपयांच्या विमा परताव्याचा धनादेश सुपूर्द

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील मौजे शेळगाव येथील तुळजाभवानी अर्बन चे खातेदार कै. चंद्रशेखर शिवरुद्र गलांडे यांचा काही दिवसांपूर्वी दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांनी तुळजाभवानी अर्बन शाखा सोनपेठ शी केलेल्या व्यवहारातून मिळणारी विमा परताव्याची रक्कम २१५०००/- रूपये व तारण ठेवलेले सोने त्यांच्या कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आले.

आपल्या पारदर्शक कारभारासाठी नेहमीच चर्चेत राहिलेली व खातेदारांच्या सुखदुःखात नेहमीच सहभागी होत असलेली तुळजाभवानी अर्बन कडून व्यवहारातून नुकतेच माणुसकीचे दर्शन घडले. मौजे शेळगाव येथील कै. चंद्रशेखर गलांडे यांचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला, त्यांनी तुळजाभवानी अर्बन शाखा सोनपेठ कडून गोल्ड लोन व फास्ट्रॅक व्यवसाय लोन घेतले होते या कर्ज प्रकरणांवर खातेदारांचा विमा काढला जातो कै.गलांडे यांच्या दुर्दैवी अपघाती मृत्यूनंतर हा विमा परतावा त्यांच्या कुटुंबियांकडे सुपूर्द करण्याची सामाजिक बांधिलकी तुळजाभवानी अर्बनने जपली व सदरील वीमा परतावा रक्कम २१५००० रूपयांचा धनादेश व सोने कै.गलांडे यांच्या कुटुंबियांकडे सुपूर्द केले.

मुळात गोल्ड लोन व इतर कर्ज प्रकरणांवर खातेदारांच्या अपघाती मृत्यूनंतर विमा परतावा असतो हे खातेदारांना माहीत नसताना सुद्धा तुळजाभवानीने स्वतः पुढाकार घेऊन ही रक्कम त्यांच्या कुटुंबांकडे सुपूर्द केली .

या कामी तुळजाभवानी अर्बन चे चेअरमन चंद्रकांत शेजुळ व मुख्य कार्यकारी अधिकारी शहाजी शेजुळ यांच्या मार्गदर्शनाखाली तुळजाभवानी अर्बन शाखा सोनपेठ चे विभागीय अधिकारी गणेश अर्दाड ,शाखा व्यवस्थापक प्रकाश फपाळ यांचेसह सर्व कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. संस्थेने आपल्या खातेधारका प्रती दाखवलेली निष्ठा आणि तत्परता यामुळे शेळगाव सह परिसरातील नागरिकांतुन समाधान व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### भारनियमनाविरोधात बोरीतील ग्रामस्थांचा महावितरण कार्यालयावर मोर्चा ; वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील करवली, कोक, रोहिला पिंपरी आणि कसर या गावांतील शेकडो नागरिकांनी रविवारी (दि. १९) महावितरणकडून सुरू असलेल्या भारनियमनाच्या निषेधार्थ बोरी येथील महावितरण कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी उपअभियंत्यांना निवेदन सादर करून भारनियमन तात्काळ बंद करण्याची मागणी केली.

वारंवार होणाऱ्या वीज कपातीमुळे शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांचे मोठे नुकसान होत असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली. निवेदनात नमूद केल्यानुसार, अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतीची कामे, विद्यार्थ्यांचा अभ्यास, लघुउद्योग आणि दैनंदिन व्यवहार विस्कळीत होत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने संताप व्यक्त करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांनी भारनियमन तात्काळ बंद करणे, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करणे तसेच पावसाळ्यात विद्युत अपघात टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे अशा विविध मागण्या महावितरण प्रशासनासमोर मांडल्या.

दरम्यान, बोरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एस. एन. थोरवे यांनी घटनास्थळी धाव घेत आंदोलकांशी संवाद साधला. शांततेच्या मार्गाने आंदोलन करून आपले प्रश्न मांडावेत, प्रशासनाकडून त्यावर सकारात्मक तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले. आंदोलनादरम्यान काही युवकांनी शाखा अभियंता रोकडे यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून नागरिकांच्या समस्या मांडल्या. यावर रोकडे यांनी भारनियमन बंद करण्यासाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी महावितरणचे कर्मचारी सुधाकर संगेकर यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

### नांदेड विभागात अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध विशेष मोहीम

**परभणी,/प्रतिनिधी :** दक्षिण मध्य रेल्वे मुख्यालयाच्या निर्देशानुसार नांदेड रेल्वे विभागात १३ ते १९ जुलै २०२६ या कालावधीत रेल्वेगाड्या आणि रेल्वे स्थानकांवरील अनधिकृत फेरीवाल्यांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात आली. प्रवाशांची सुरक्षितता, स्वच्छता आणि रेल्वे परिसरातील शिस्त राखण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत ४७ अनधिकृत फेरीवाल्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

मोहिमेदरम्यान रेल्वे कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार कारवाई करून संबंधितांकडून एकूण ३६ हजार ८५० इतका दंड वसूल करण्यात आला. रेल्वेगाड्या आणि स्थानक परिसरात अनधिकृत विक्री करणाऱ्यांमुळे प्रवाशांना होणारा त्रास, स्वच्छतेवर होणारा परिणाम आणि सुरक्षेच्या दृष्टीने निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली. ही विशेष मोहीम मनमाड-जालना, पूर्णा-अकोला, नांदेड-पूर्णा, पूर्णा-छत्रपती संभाजीनगर, मुदखेड-छत्रपती संभाजीनगर, पूर्णा-वाशीम, आदिलाबाद-मुदखेड तसेच पूर्णा-परळी वैजनाथ या रेल्वे मार्गांवर राबविण्यात आली. रेल्वे प्रशासनाच्या मते, अशा नियमित मोहिमांमुळे केवळ अधिकृत विक्रेत्यांकडूनच सेवा उपलब्ध होण्यास मदत होते. त्यामुळे प्रवाशांना सुरक्षित, स्वच्छ आणि दर्जेदार सेवा मिळण्यास हातभार लागतो. रेल्वे परिसरातील अनधिकृत व्यावसायिक हालचालींना आळा बसून स्थानकांवरील शिस्त आणि सुव्यवस्था राखण्यास मदत होते. दरम्यान, नांदेड विभागाने भविष्यातही अशा अचानक तपासण्या आणि विशेष मोहिमा नियमितपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. अनधिकृत फेरीविक्री रोखून प्रवाशांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी रेल्वे प्रशासन कटिबद्ध असल्याचे जनसंपर्क विभागाने कळविले आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना खाद्यपदार्थ आणि इतर वस्तूंची खरेदी केवळ अधिकृत रेल्वे विक्रेते, कॅन्टीन आणि स्टॉलधारकांकडूनच करण्याचे आवाहन केले आहे. तसेच अनधिकृत फेरीवाल्यांना प्रोत्साहन न देता अशा प्रकारची कोणतीही बाब निदर्शनास आल्यास रेल्वे कर्मचारी किंवा रेल्वे हेल्पलाईन क्रमांक १३९ वर तात्काळ माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जांब बु येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर करण्याची पालकमंत्र्यांकडे मागणी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्याच्या आरोग्य राज्यमंत्री तथा पालकमंत्री मा. सौ. मेघनादीदी साकोरे-बोर्डीकर यांच्या जनता दरबारात जांब बु (ता. जिंतूर) येथील नागरिकांच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र () मंजूर करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. जांब बु व परिसरातील नागरिकांना आरोग्य सेवा मिळविण्यासाठी सुमारे १४ किलोमीटर अंतरावर जावे लागत असल्याने गर्भवती माता, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले तसेच आपत्कालीन रुग्णांची मोठी गैरसोय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले.

जांब बु हे परिसरातील सर्व गावांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे येथे प्राथमिक आरोग्य केंद्र मंजूर झाल्यास जांब बु, जांब तांडा, सारखेडा, सारखेडा ३ तांडे, जांब खुर्द, कुडा, कोलदंडी, मानमोडी, रायखेडा, रायखेडा तांडा, महादेव नगर तांडा, मालेगाव, पिंपळा आदी गावांतील हजारो नागरिकांना आरोग्य सेवेचा थेट लाभ होणार असल्याचे सांगण्यात आले. यावेळी भाजप कामगार आघाडीचे जिंतूर तालुकाध्यक्ष सचिन मोहनराव आढे यांनी पालकमंत्री मेघनादीदी साकोरे-बोर्डीकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन सादर केले. निवेदनाची दखल घेत पालकमंत्र्यांनी या मागणीबाबत सकारात्मक विचार करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या प्रसंगी संबंधित अधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# जिंतूर तालुक्यातील मुदत संपणाऱ्या १०१ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रारूप मतदार यादी २४ जुलै रोजी प्रसिद्ध

**जिंतूर,/प्रतिनिधी:** मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी त्यांचे पत्र क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२६/प्र.क्र.०२/का-८, दिनांक १५/०७/२०२६ अन्वये राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी संगणक प्रणालीद्वारे मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

सदर कार्यक्रमानुसार १५/०४/२०२६ हा मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक निश्चित करण्यात आला असून २४/०७/२०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. तसेच २४/०७/२०२६ ते २९/०७/२०२६ या कालावधीत हरकती व सूचना स्वीकारण्यात येणार असून ०४/०८/२०२६ रोजी प्रभागनिहाय अंतिम



मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.जिंतूर तालुक्यात सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या १०१ ग्रामपंचायती आहेत. या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी जाहीर करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार २४/०७/२०२६ रोजी संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

तसेच प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना २४/०७/२०२६ ते २९/०७/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत तहसील कार्यालय, जिंतूर येथे स्वीकारण्यात येतील. मा. सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या आदेश क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.३/का.८, दिनांक १६/०७/२०२५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नमुना 'अ' व नमुना 'ब' मध्येच आवश्यक कागदपत्रांसह आक्षेप अर्ज सादर करावेत. सदर कार्यक्रमाचा लाभ संबंधित मतदारांनी घ्यावा व आवश्यक असल्यास विहित मुदतीत हरकती अथवा सूचना सादर कराव्यात, असे आवाहन उपविभागीय अधिकारी, सेलू शैलेश लाहोटी व तहसीलदार, जिंतूर शितल कच्छवे यांनी केले आहे.



**परभणी-जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदी दिनेश बोबडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना डॉ.आमदार राहुल पाटील, डॉ. विवेक नावंदर, शिवसेना जिल्हाप्रमुख रवींद धर्मे, जवंजाळ दाजी,नगरसेवक बबलू घागरमाळे, राजेश रणखांब, अर्जुन गुजर,उद्धव मोहिते, बाळराजे तळेकर, संदीप झाडे, व आधी दिसत आहेत**

### सेलूत 'हॅप्पीनेस प्रोग्राम'चे आयोजन

**सेलू,/प्रतिनिधी :** आर्ट ऑफ लिविंग परिवार सेलू यांच्या वतीने नागरिकांसाठी 'हॅप्पीनेस प्रोग्राम'चे आयोजन दिनांक २९ जुलै ते ०२ ऑगस्ट २०२६ दरम्यान करण्यात आले असून या शिबिराद्वारे जगभरात प्रसिद्ध असलेली सुदर्शन क्रिया शिकविण्यात येणार आहे. तणावमुक्त आणि आनंदी जीवनशैलीचा अनुभव देणाऱ्या या कार्यक्रमासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असल्याची माहिती आर्ट ऑफ लिविंगचे प्रशिक्षक किशोर घडे यांनी यावेळी आवाहन करण्यात आले आहे.

# त्या मारहाणीच्या निषेधार्थ पूर्णेतील निबंधक कार्यालयाचे कामकाज बंद

**पूर्णा,/प्रतिनिधी-** पुणे येथे कार्यालयातील दुय्यम निबंधक रवींद्र कोळी यांना झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ सोमवारी पूर्णा येथील दुय्यम निबंध कार्यालयातील कामकाज बंद ठेवल्यामुळे दैनंदिन कामकाजावर परिणाम झाला व जनतेची गैरसोय झाली.पुणे येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील रवींद्र कोळी यांना काही दिवसापूर्वी कार्यालयात मारहाण झाल्याची घटना झाली होती या घटनेच्या निषेधार्थ सोमवारी दुय्यम निबंधक कर्मचारी संघटनेच्या वतीने महाराष्ट्रभर काम बंद आंदोलन करण्यात आले होते.

त्यानुसार पूर्णा येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन केले होते यामध्ये येथील दुय्यम निबधक सुरज माळी यांच्यासह इतर सर्व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता त्या कामाला आंदोलनामुळे कार्यालयात आलेल्या खरेदी विक्रीच्या व्यवहारासाठी आलेल्या लोकांची गैरसोय झाली,तसेच सोमवारी कामकाज पूर्णपणे ठप्प झाले होते.

# संत जनाबाई तीर्थक्षेत्र विकासासाठी ४८ कोटी ५५ लाख रुपयांच्या निधीस अंतिम मंजुरी

## आ.डॉ.गुट्टेंच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश : संतपरंपरेच्या संवर्धनासाठी सरकारचा योग्य निर्णय

**गंगाखेड,/प्रतिनिधी-:** महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील तेजस्वी अध्याय असलेल्या संत जनाबाई यांच्या पवित्र जन्मभूमीच्या सर्वांगीण विकासासाठी अखेर राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री तथा महायुती सरकारचे नेतृत्व करणारे देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संत जनाबाई तीर्थक्षेत्र विकासासाठी तब्बल ४८ कोटी ५५ लाख रुपयांच्या निधीस अंतिम मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्याकडून गेल्या दोन वर्षांपासून सातत्याने सुरू असलेल्या पाठपुराव्याला मिळालेले हे मोठे यश मानले जात असून, संत जनाबाईंच्या पावन भूमीच्या विकासाचा नवा अध्याय आता सुरू होणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयामागे राज्य शासनाकडे सातत्याने करण्यात आलेल्या पाठपुराव्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. संत जनाबाई तीर्थक्षेत्राचा विकास केवळ स्थानिक पातळीपुरता मर्यादित न ठेवता तो राज्याच्या धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटन विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असल्याची भूमिका शासनासमोर प्रभावीपणे मांडण्यात आली होती. त्यानुसार मंदिर परिसराच्या विकासासाठी सुमारे ५० कोटी रुपयांचा सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करून राज्य शासनाकडे सादर करण्यात आला होता. यासंदर्भात मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष बैठक पार पडली होती. या बैठकीत विकास आराखड्यातील प्रत्येक घटकावर सविस्तर चर्चा झाली. मंदिर परिसराचा विकास, भाविकांच्या सोयी-सुविधा, पर्यटनवृद्धी, परिसराचे सुशोभीकरण आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या विविध बाबींचा सखोल आढावा मुख्यमंत्री महोदयांनी घेतला. श्रद्धा, संस्कृती आणि विकास यांचा समतोल साधणारा हा आराखडा असल्याचे नमूद करत त्यांनी या प्रस्तावाकडे सकारात्मक दृष्टीने विचार करून अंतिम मंजुरी दिली आहे. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी संत जनाबाईंच्या कार्याचा आणि महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील त्यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख केला होता. संतांच्या स्मृती जपणे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे जतन करणे होय, अशी भूमिका व्यक्त करत त्यांनी विकास आराखड्याला अंतिम मंजुरी दिल्याची घोषणा केली. परिणामी ग्वाही दिली होती. राज्य शासनाच्या संवेदनशील आणि विकासाभिमुख भूमिकेची प्रचिती पुन्हा एकदा आली असल्याचे स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी सांगितले. ४८ कोटी ५५ लाख रुपयांच्या निधीतून मंदिर परिसराचा सर्वांगीण कायापालट होणार आहे. या आराखड्याअंतर्गत मंदिर परिसराचे सुशोभीकरण, भाविकांसाठी आधुनिक पायाभूत सुविधा, सुरक्षितता व्यवस्था, स्वच्छता, पार्किंग, निवास व्यवस्था, मूलभूत नागरी सुविधा तसेच धार्मिक पर्यटनाला चालना देणाऱ्या विविध विकासकामांची अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यामुळे राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना अधिक सुसज्ज आणि सुविधायुक्त तीर्थक्षेत्राचा अनुभव मिळणार आहे, असेही आ.डॉ.गुट्टे यांनी आवर्जून स्पष्ट केले. या विकासामुळे केवळ धार्मिक पर्यटनालाच चालना मिळणार नाही, तर स्थानिक रोजगारनिर्मिती, व्यापार, लघुउद्योग, महिला बचतगट, स्थानिक हस्तकला आणि सेवा क्षेत्रालाही मोठी गती मिळेल. परिणामी संपूर्ण परिसराच्या आर्थिक विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तीर्थक्षेत्र विकासाचा हा आराखडा ग्रामीण विकास आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठीही महत्त्वपूर्ण ठरणार आहे, असेही आ.डॉ. गुट्टे यांनी नमूद केले.

दरम्यान या ऐतिहासिक निर्णयाबद्दल स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली आहे. संत जनाबाईंच्या पावन भूमीच्या विकासासाठी जनभावना समजून घेत त्यांनी घेतलेला हा निर्णय संतपरंपरेला वाहिलेली विकासाची आदरांजली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. तसेच श्रद्धा, विकास आणि जनकल्याण यांचा सुंदर समन्वय साधणाऱ्या या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या संतवैभवाला नवे अधिष्ठान प्राप्त होईल, असाही विश्वास व्यक्त केला.

संपादकीय

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# प्रश्न, प्रतिमा आणि प्रतिभा

'सेलिब्रिटी' किंवा 'उत्सवमूर्ती' नावाचे वलय व्यक्तिमत्त्वाला प्राप्त झाले म्हणजे आपल्या प्रत्येक शब्दाला अधिकाराची धार आपसूकच प्राप्त होते असा समज समाजमाध्यमांच्या जमान्यात बळावणे साहजिक आहे. आपल्या अफाट प्रतिभाशक्तीच्या आणि जगण्याचे शिकविलेल्या प्रत्येक धड्यातील अनुभवांना प्रतिभेचे लेणे चढवून घेतलेल्या शब्दांच्या आधाराचर व्यक्त होणाऱ्या काही आदरणीय व्यक्तिमत्त्वांनी आपल्या प्रतिभेच्या जोरावर कालातीत स्वरूपाचे काही भाष्य केले. गेल्या शतकाच्या अखेरच्या पंचविशीत, कविवर्य विंदा करंदीकर, कवी वसंत बापट, मंगेश पाडगांवकर यांसारख्या कवींच्या संवेदना त्या काळातील एकूणच सामाजिक, राजकीय परिस्थितीच्या रेट्याने पिचलेल्या समाजाच्या वेदना पाहून आणि प्रत्यक्ष अनुभवूनही अस्वस्थ झाल्या आणि त्यांच्या प्रतिभेला स्वानुभवाने लगडलेल्या शब्दांचे ताकदवान पंख लाभले. त्या भराऱ्यांतून या वेदना कवितांच्या रूपाने शब्दांचा साज घेऊन दाहकपणे समाजासमोर आल्या. त्यांच्या कोणत्याही शब्दावर सुपारीबाजपणाचा आरोप ठेवण्याची हिंमत त्या शब्दांनी जखमी झालेल्यांनी किंवा पोळलेल्यांनीदेखील करता आली नसती, एवढा प्रामाणिकपणा त्यांच्या शब्दांत होता. कवींच्या शब्दात अशी ताकद तेव्हाच निर्माण होते, तेव्हा त्याचे शब्द स्वतंत्र, स्वाभिमानी आणि प्रामाणिक संवेदनशीलतेने लगडलेले असतात! त्यामुळे त्यांच्या प्रतिभेला मान्यता मिळतेच आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाभोवतीचे 'उत्सवमूर्ती' असण्याचे वलय असे उजळून निघते. विंदांच्या अशा कितीतरी कवितांनी समाजाच्या वेदना मांडल्या, सत्तेवर आणि सत्ताधीशांवर संयत आसुडही ओढले. वसंत बापटांच्या कवितांनाही तशीच, स्वाभिमानाची, अस्वस्थ जाणिवांची आणि वेदनेची धार होती. पाडगावकरांनी आपल्या शैलीत हीच परंपरा जपली आणि कवी हा केवळ त्या क्षेत्रातील 'सेलिब्रिटी' नसतो, तर समाजाचा 'जागल्या' म्हणून काम करण्याची स्वयंस्फूर्त जबाबदारी पेलणारा राखणदार असतो, हे सिद्ध झाले. सर्वसामान्य समाज आपल्यापुढील समस्यांशी झगडण्याच्या आणि संघर्षाच्या वेदनांना सामोरे जाण्याच्या कसरतीत आपली सारी शक्ती पणाला लावत असताना काहीसा दुबळा होऊन जातो. आपल्या समस्यांचे ओझे वाहणे अवजड होत असताना समाजाच्या समस्यांचे ओझे पाठीवर घेण्याची त्याची उमेद कमीच झालेली असते. अशा वेळी, मौन राहिले तर या समस्यांना वाचा फुटणार कशी आणि समस्याग्रस्तांना वाली राहणार कोण अशी स्थिती जेव्हा येते, तेव्हा कवीच्या प्रखर जाणिवांना प्रतिभेचे पंख फुटतात.

गेल्या शतकातील अखेरच्या काही दशकांत अशा जळजळीत जिवंतपणाशी जवळीक असलेल्या कविता आता काळाच्या प्रवाहात मात्र काहीशा गढूळल्या आहेत किंवा कसे, याची शंका यावी असा सूर घेऊन समाजमाध्यमांवर 'व्हायरल' वगैरे होताना दिसतात. गढूळलेल्या कवितांच्या समाजमाध्यमांवरील गर्दीला दर्दी काव्यप्रेमींची दाद मिळत नसली, तरी त्या फोफावतात आणि त्यांचीच चर्चा अधिक होते. कवितेसारख्या साहित्यविश्वातील श्रेष्ठ क्षेत्राची अशी अवस्था होत असतानाही, विंदा, बापट, पाडगावकरांसारख्या श्रेष्ठ कवींच्या कालातीत कवितांना रांगेत त्यांना बसविण्याचे प्रयत्न होत असतील, तर ते अधिक चिंताजनक आहे.

मराठी साहित्यात कविवर्य विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगावकरांसारख्या सिद्धहस्त, प्रतिभावान कवींनी स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठी कविता खऱ्या अर्थाने समृद्ध केली. आधुनिक काळात कवींच्या गर्दीत आता नेते किंवा अभिनेत्यांसारख्या 'सेलिब्रिटीं'च्या शब्दप्रतिभेलाही पंख फुटू लागले असले तरी त्यांच्या शब्दांतून उमटणाऱ्या सामाजिक, राजकीय पर्यावरणाविषयीच्या चिंतेवरच शंकेची पुटे चढलेली दिसत आहेत. विंदांच्या कवितेनेही त्या काळात, 'जनतेचे राज्य' नावाच्या कवितेने झणझणीत अंजन समाजाच्या डोळ्यात घातले होते. त्यांच्या 'सगळेच कसे सपक सपक' या कवितेने समाजाच्या अस्वस्थ सुस्तीवर आणि राजकारणातील मूल्यहीनतेवर चिंता व्यक्त केली होती. 'देशाचा नेता कसा? सपक जनता कशी? सपक' या शब्दांतून उमटणाऱ्या प्रामाणिक अस्वस्थतेचीही त्या काळी चर्चा झाली. त्यातील नकारात्मक सुरांवर बोटेदेखील ठेवली गेली आणि त्यांना त्यावरून टीकादेखील सहन करावी लागली. आणिबाणीसारख्या काळ्या कालखंडामुळे उमटलेल्या अस्वस्थपणातून शब्दबद्ध झालेल्या कवितांमधून काही शब्द वगळावेही लागले, पण त्यांच्या कवितेवर कधीच सुपारीबाजपणाच्या किंवा धंदेवाईकपणाचा ठपका बसला नव्हता. पाडगांवकर, विंदा किंवा बापट यांसारख्या कोणाही कवीच्या कवितेतून निर्माण झालेल्या वादाला सत्तेच्या किंवा आर्थिक लोभ वा लाभाच्या संशयाचा स्पर्शदेखील नव्हता आणि हे समाजाला खात्रीपूर्वक ठाऊक होते. सत्तेला आरसा दाखविणे हे कवीचे कर्तव्य असते हे खरेच, पण सोयीस्करपणे असा आरसा हाती घेऊन तो कोणा विशिष्ट वेळी सत्तेसमोर धरणे त्यांना कधीच जमले नाही. आजच्या काळातील अनेक कवितांमध्ये राजकीय सोयीनुसार वापरणे सोयीचे व्हावे अशा शब्दांची लयलूट दिसते, तेव्हा ज्या माध्यमांच्या मंचावरून त्या जगजाहीर होतात, त्याच मंचावर त्यांचे वाभाडेदेखील निघतात. केवळ उत्सवमूर्ती किंवा सेलिब्रिटी म्हणून एखाद्या क्षेत्रातील प्रतिष्ठा प्राप्त झाली की त्याचे वजन वापरून कोणत्याही क्षेत्रात लुडबुड करण्याचा अधिकार स्वतःकडे घेण्याची प्रसिद्धीची एक सोपी रीत अलिकडे विकसित होताना दिसत आहे. समाजाला ते जेव्हा जाणवते, तेव्हा अशा गल्लाभरू शब्दांचे वजन आपोआप कमी होतेच, पण कवितेसारख्या समृद्ध दालनाची प्रतिष्ठादेखील पणाला लागते. अलिकडच्या काही कविता केवळ सरकारांना किंवा सत्तेलाच लक्ष्य का करतात, त्यांना समाजातील उणिवा दिसत नाहीत का, त्या उणिवांनी त्यांची तथाकथित प्रतिभावंत मने अस्वस्थ होत नाहीत का, असे अनेक प्रश्न यामुळेच अलिकडे वारंवार विचारले जाऊ लागले आहेत. ते वास्तविक असेल, तर ते वर्तमानाच्या प्रवाहात वाहवत जाण्यासारखेच ठरेल. कवितेच्या प्रांताने अशा वाहवत जाण्यापासून सावध राहावयास हवे. कोणी एके काळी कवी हा समाजसौख्याचा राखणदार म्हणून ओळखला जात असे. आता समाजास कवितांचा राखणदार म्हणून काम करावे लागणार असेल, तर कवितांचा पुढचा काळ कसा असेल याचा गंभीर विचार व्हावयास हवा. व्यवस्थेला प्रश्न विचारणे हा साहित्याचा स्वभावच असतो. मात्र, या प्रश्नांना प्रामाणिक अस्वस्थतेची जोड असावयास हवी. अन्यथा, प्रसंगानुरूप निर्माण होणारे प्रश्न अशाच प्रसंगांच्या वेळी कोठे दडी मारतात अशी शंका घेण्यास वाव मिळतो. जुन्या काळातील कवींनी कोणत्याच राजकीय पक्षाशी स्वतःस बांधून घेतले नव्हते, त्यामुळे कोणा एका पक्षाची पाठराखण करण्यासाठी आपल्या प्रतिभेला वेठीस धरणे किंवा कोणा एका पक्षाच्या विरोधासाठी प्रतिभेचा लिलाव मांडणे त्यांना कधीच जमलेदेखील नाही. जेव्हा समाजासमोरील प्रश्न उग्र होतात, तेव्हा लोकभावना शब्दांत मांडणे ही आपली पहिली भूमिका आहे, हे त्यांना माहीत होते. कवितेच्या प्रांताचे तसे संस्कारच होते. असे संस्कार पुन्हा एकदा जागविण्याची गरज अधूनमधून अधोरेखित होऊ लागली आहे. कारण, बदलत्या संदर्भामुळे आणि असहिष्णुतेमुळे सध्याचे वाद अधिक गडद होऊ लागले आहेत, संवेदनशीलतादेखील नाजूक होत चालली आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच करू नये, पण अभिव्यक्तीचा अतिरेकही होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. कारण साहित्याच्या प्रांताची तशी परंपरा आहे. ■

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# सत्ताबदलाची आशा की नवी निराशा ?

नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह (बालेन शाह) यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले.

आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत.



नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळमधील सद्यस्थिती ही दक्षिण आशियातील तरुण पिढीच्या आक्रोशाचे आणि लोकशाही व्यवस्थेकडून असलेल्या अवास्तव अपेक्षेचे प्रतीक आहे. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वांत मोठी हमी असू शकते. नेपाळने गेल्या काही वर्षांमध्ये दक्षिण आशियातील सर्वाधिक वेगाने बदलणारे राजकारण अनुभवले आहे. शाह यांच्या नेतृत्वाला मोठा जनाधार मिळाला; मात्र अवघ्या काही महिन्यांमध्ये त्याच तरुणांपैकी मोठा वर्ग रस्त्यावर उतरला आहे. ज्यांनी बदलाची स्वप्ने पाहून नव्या नेतृत्वाला सत्तेपर्यंत पोहोचवले, तेच आता सरकारच्या विरोधात उभे राहिल्याने नेपाळच्या लोकशाहीसमोर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. अलिकडील आंदोलनाची ठिणगी एका तरुणाच्या आत्मदहनाच्या घटनेतून पडली असली, तरी त्यामागे दीर्घकाळ साचलेला सामाजिक आणि राजकीय असंतोष आहे. भूमिहीनांच्या बेदखलीच्या कारवाया, पोलिसांच्या कथित कठोर वर्तनाविरोधातील नाराजी आणि शासनाच्या निर्णयप्रक्रियेबद्दलचा रोष एकत्र येत आंदोलनाचे व्यापक रूप घेत गेले.

शाह यांचा उदय हा नेपाळच्या पारंपरिक राजकारणावरील अविश्वासाचा परिणाम होता. दीर्घकाळ सत्तेत राहूनही प्रमुख पक्ष बेरोजगारी, भ्रष्टाचार, महागाई आणि प्रशासनातील अकार्यक्षमता दूर करू शकले नाहीत. त्यामुळे 'सोशल मीडिया'वर सक्रिय, थेट संवाद साधणारे आणि पारंपरिक राजकीय घराण्यांपासून दूर असलेले शाह हे बदलाचे प्रतीक बनले. निवडणुकीतील त्यांचा विजय हा केवळ राजकीय नव्हता, तर नेपाळमधील तरुणांच्या अपेक्षांचा विजय मानला गेला; मात्र सत्ता मिळवणे आणि सत्ता चालवणे यात मोठा फरक असतो. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारकडून लोकांच्या अपेक्षा अत्यंत मोठ्या होत्या. भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर कारवाई, पारदर्शक प्रशासन, रोजगारनिर्मिती, सार्वजनिक सेवांमध्ये सुधारणा आणि सामाजिक न्याय या आघाड्यांवर जलद परिणाम दिसतील, अशी अपेक्षा होती; पण प्रत्यक्षात प्रशासनातील जटिलता, आर्थिक मर्यादा आणि धोरणात्मक अडथळ्यांमुळे अपेक्षित वेगाने बदल घडू शकले नाहीत. यामुळे समर्थकांमध्येच निराशा वाढू लागली. नेपाळमधील सध्याचे आंदोलन ही केवळ एका घटनेविरोधातील प्रतिक्रिया नाही. ते विश्वासभंगाचे आंदोलन आहे. लोकशाहीत जनतेचा पाठिंबा कामगिरीवर टिकून राहतो, हे या घटनांमधून स्पष्ट होते. नेपाळमध्ये बेरोजगारी हे अजूनही मोठे आव्हान आहे. मोठ्या प्रमाणावर नेपाळी युवक रोजगारासाठी परदेशात जात आहेत. देशांतर्गत उद्योग आणि गुंतवणुकीचा वेग अपेक्षेइतका वाढलेला नाही. महागाई, अतिक्रमण हटवण्याच्या मोहिमांमुळे अनेक कुटुंबांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली.

राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. ■

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# मधमाशी निसर्गाची अमूल्य देणगी

पर्यावरणाचा समतोल बिघडल्याने पर्यावरणातील विविध घटकांवरही त्याचा गंभीर परिणाम होत आहे. त्यामुळे मानवाच्या आहारामधील अन्नसाखळीवरही होणारे दुष्परिणाम आता समोर येऊ लागले आहेत. ते एवढे गंभीर आहेत की, संपूर्ण मानवजातीला ते अभिशाप ठरू शकतात. त्यातील एक अभिशाप म्हणजे नष्ट होणारी मधमाशी. मानवाच्या अन्नसाखळीमधील महत्त्वाचा दुवा असणारी मधमाशी एक लहानसा कीटक जरी दिसत असला तरी त्याच्या अफाट कार्याची आम्हाला माहिती नाही. मधमाशी ही निसर्गाची अनमोल देणगी असून, मानवजातीच्या अस्तित्वासाठी मानवानेच तिचे रक्षण करणे प्रथम कर्तव्य ठरते. अल्बर्ट आईन्सटाईन यांनी म्हटले आहे की, 'ज्या दिवशी पृथ्वीवरून मधमाशा नष्ट होतील, त्यानंतर चार वर्षांमध्ये मानव जात नष्ट होईल'. हे त्यांचे विधान मधमाशांचे पर्यावरणामधील महत्त्व अधोरेखित करते. मधमाशी केवळ मध देणारे कीटक नसून, आपल्या पर्यावरणाचा मुख्य आधारस्तंभ आहे. फुलांमधून मध गोळा करताना होणारे परागीभवन ही प्रक्रिया मुख्यतः मधमाशांद्वारे पार पाडली जाते. मानवाची अन्नसाखळी आणि जैवविविधता टिकवून ठेवणे ही त्यांची सर्वाधिक मोठी कामगिरी आहे. एकप्रकारे मानवजातीसाठी निसर्गाने दिलेले एकप्रकारचे वरदान म्हणावे लागेल. पीक आणि फूलझाडांच्या पुनरुत्पादनासाठी निसर्गामधील मधमाशांचे स्थान अनन्यसाधारण आहे. आपल्या अन्नाच्या शोधात मधमाशा एका फुलावरून दुसऱ्या फुलावर उडतात. या क्रियेमध्ये फुलांचे परागकण त्यांच्या अंगाला चिकटतात आणि नंतर ते एका फुलावरून दुसऱ्या फुलावर पसरतात. या नैसर्गिक प्रक्रियेमुळे वनस्पतीमध्ये फळधारणा व बियाणे तयार होतात.

संयुक्त राष्ट्राच्या अन्न आणि कृषी संघटनेच्या अहवालानुसार जगामधील जवळपास एक तृतीयांश अन्न उत्पादन हे मधमाशांच्या परागीभवनावर अवलंबून आहे. फक्त मानवजातच नव्हे तर जंगलामधील वन्यजीव आणि पक्ष्यांसाठी लागणारे फळे, बिया, फुले यासारखे अन्न हे त्यांच्यामुळेच तयार होते. त्यामुळे मधमाशांचे अस्तित्वच संपले तर वनस्पतीचे पुनरुत्पादन थांबून या भूतलावरच्या अनेक प्रजाती नष्ट होतील. सध्या नेमकी याच दिशेने आपली वाटचाल सुरू आहे. सेंद्रिय शेतीवरून रासायनिक शेतीकडे वळल्यानंतर हा प्रश्न अधिक गंभीरतेने समोर आला आहे. तो दिवसेंदिवस अधिक बिकट होत आहे. या आधुनिक युगामध्ये झालेल्या पर्यावरणामधील बदल हा मधमाशांसाठी अतिशय घातक आहे. त्यामुळे निसर्गामधील मधमाशांची संख्या दिवसेंदिवस झपाट्याने कमी होत आहे. मानवजातीने भविष्यासाठी हा विषय गंभीरतेने न घेतल्यास त्याचे अतिशय घातक परिणाम आम्हाला भोगावे लागू शकतात. आजच्या आधुनिक युगामध्ये मानवाने आपल्या स्वार्थासाठी निसर्गाचा समतोल पार बिघडवला आहे. शेतीमध्ये रासायनिक खते आणि विषारी कीटकनाशकांचा अनिर्बंध वापर केला जात आहे. याचा थेट विषारी परिणाम मधमाशांवर होत आहे. तसेच अमाप जंगलतोडीमुळे मधमाशांचे नैसर्गिक अधिवासही नष्ट होत आहेत. मधमाशी म्हटले की, तिच्यापासून फक्त मधच मिळतो, हीच भावना लोकांच्या मनामध्ये घर करून बसली आहे. त्यांचे मुख्य कार्य परागसिंचन करणे हे अजूनही दुर्लक्षितच आहे. मधमाशा हे प्रदूषित परिसरामध्ये आपले पोळे बांधत नाही. त्यांना प्रदूषणमुक्तच जागा लागते. त्यामुळे मधमाशांचे पोळे हे स्वच्छ पर्यावरण आणि समृद्ध जैवविविधतेचे निर्देशक समजले जाते. मधमाशांची निर्मिती ही मनावर अनंत उपकारापैकी एक आहे. त्याची आम्हाला अजूनही साधी जाणीव झाली नाही. जगामध्ये दररोज फुटणारी लाखो टन बारुद, वाढणारी सिमेंटची जंगले, विषारी रसायनांचा झालेला अतिरेक त्यामुळे मधमाशांचा अधिवास दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. याकडे अजूनही फारसे गांभीर्याने बघितले जात नाही, हे एक कटुसत्य आहे. त्यामुळे मधमाशांचा अंत हा मानव जातीचा अंत आहे, हे पक्के ध्यान्यात ठेवले पाहिजे. पर्यावरणाचा समतोल राखून जर आम्ही वाटचाल केली तर मधमाशांचे निसर्गचक्र कायम ठेवण्यात मानवच हातभार लावू शकतो. निसर्गचक्रामध्ये मानवी हस्तक्षेप किती दिवस निसर्ग सहन करणार आहे. त्यास असेच जर सतत ओरबाडत राहिले तर त्याच्या कोपाला मानवच बळी पडणार आहे. त्यामुळे वेळीच सावरून निसर्गाशी केलेली मैत्री मानवाच्या कल्याणाचा मार्ग मोकळा करू शकते. ■

९८८१७१७८५६

## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# वस्त्रोद्योगातील कौशल्य आणि करीअरच्या संधी

आज जागतिक स्तरावर भारतातील तयार कपडेनिर्मिती उद्योगाने व्यावसायिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान प्राप्त केले आहे. यासंदर्भातील विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, भारतातील तयार कपड्यांच्या कौशल्यासह त्याला लाभलेली भारतीय धर्तीच्या कलाकुसरीने जगालाही भुरळ घातली. यामागे देशांतर्गत विविध शैलीच्या कलेची व कारागिरीची या व्यवसायाला परंपरागत स्वरूपात लाभलेली साथ आजही कायम असून, भारतीय तयार कपडे उद्योगाला अधिक रंगतदारच नव्हे, तर अर्थपूर्ण बनवत आहे.

सकृद्दर्शनी व संख्यात्मक स्वरूपात सांगायचे म्हणजे, भारतातील तयार कपडे उद्योगाचे देशाच्या 'सकल घरेलू उत्पादन' म्हणजेच 'जीडीपी'मध्ये २.३ टक्के, तर देशांतर्गत एकूण औद्योगिक उत्पादन क्षेत्रात १३ टक्के एवढे उल्लेखनीय योगदान आहे. मुख्य म्हणजे, भारताच्या एकूण निर्यातीमध्ये तयार कपड्यांच्या निर्यातीचे प्रमाण १२ टक्के एवढे आहे. राष्ट्रीय स्तरावरील रोजगार-संख्येच्या संदर्भात सांगायचे म्हणजे, या उद्योगात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वरूपात काम करणाऱ्या कामगार-कारागिरांची संख्या ४५ दशलक्षच्या घरात आहे. यावरूनसुद्धा या भारतीय व्यवसायाची वैश्विक व्यापकता स्पष्ट होते. याचाच परिणाम म्हणजे, विद्यार्थ्यांपासून व्यावसायिकांपर्यंत साऱ्यांसाठी आज तयार कपडे हे क्षेत्र आकर्षणाचा विषय ठरला आहे. यालाच नव्याने जोड मिळाली ती सरकारच्या सकारात्मक धोरणांची! त्यामुळे तयार कपडे बनविण्याच्या व्यावसायिक प्रक्रियेला मोठी व वाढती बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. ग्राहकांच्या बदलत्या गरजा समजून घेऊन तयार कपड्यांना नवे व आकर्षक रूपडे प्राप्त झालेले दिसते. मुख्य म्हणजे, या व्यवसाय क्षेत्रातील ग्राहकीला वयोमर्यादेचे असे बंधन नसते. त्यामुळे ग्रामीण-शहरी, गरीब-श्रीमंत अशा सर्व गट आणि वयोगटांतील ग्राहकांना तयार कपड्यांची बाजारपेठ केवळ सामावूनच घेते असे नव्हे, तर सतत आकर्षितसुद्धा करते.

परिणामी, आज फार मोठ्या संख्येने युवकांपासून महिलांपर्यंत तयार कपडे क्षेत्राकडे स्वाभाविकपणे आकर्षित होत आहेत. याला या व्यवसाय क्षेत्रातील विशेष शिक्षण-प्रशिक्षण क्षेत्राची विशेष साथ लाभली आहे. या क्षेत्रातील वाढत्या व नव्या व्यावसायिक गरजा लक्षात घेऊन 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन मॅनेजमेंट' अंतर्गत 'डिपार्टमेंट ऑफ फॅशन मॅनेजमेंट स्टडीज'ची स्थापना करण्यात येऊन त्याद्वारे नव्या विद्यार्थ्यांशिवाय या क्षेत्रात काम करणाऱ्या कारागिरांना विशेष प्रशिक्षण, मार्गदर्शन केले जाते. यामुळे शिक्षार्थीच्या ज्ञान आणि कौशल्यात तर भर पडतेच. शिवाय, त्यातून नव्या व आकर्षक स्वरूपाच्या कपडेनिर्मिती व निर्यातीला चालना मिळू लागली आहे, हे विशेष. यामध्ये आता तयार कपड्यांच्या किरकोळ व ठोक निर्मितीद्वारे त्यांची फायदेशीर विक्री करण्याच्या दृष्टीने विक्री-व्यवसायाचे विशेष मार्गदर्शन केले जाते.



अशाप्रकारे तयार कपडेनिर्मिती व्यवसायाचा आता नवे व आकर्षित करीअर क्षेत्र म्हणून प्राधान्याने विचार केला जाताना दिसतो. या क्षेत्राचा अभ्यासक्रमासह विचार करणे महत्त्वाचे ठरते. या व्यवसायामध्ये नावीन्य, वेगळेपण-विविधतेसह आकर्षकता या बाबी फार महत्त्वाच्या ठरतात. त्यातही कपड्यांच्या फॅशन पद्धतीला नेहमीच सर्वाधिक महत्त्व व पसंती देण्यात आली असल्याने त्याचा विविध अभ्यासक्रमांतर्गत प्रामुख्याने विचार करणे आवश्यक ठरते.

वर नमूद केल्याप्रमाणे फॅशन डिझाईन-टेक्नॉलॉजी व व्यवस्थापन यासारख्या क्षेत्रात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थी-उमेदवारांना खालीलप्रमाणे करीअर पर्याय उपलब्ध असतात व त्यांच्या कामकाजाचे स्वरूप सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे असते :

**फॅशन व रिटेल मॅनेजर :** तयार कपड्यांच्या व्यवसायवाढीसाठी विक्री केंद्रांचे नियोजन करून विक्री व्यवस्थापनाला चालना देणे.

**ब्रॅण्ड मॅनेजर :** तयार कपड्यांच्या व्यवसाय क्षेत्रात नावीन्य, फॅशन व विविधता यांच्याच जोडीला विशिष्ट व्यावसायिक कंपनीच्या वैशिष्ट्यांची ग्राहकांकडून आवर्जून दखल घेण्यासाठी विशेष चिन्हासह व्यावसायिक पृष्ठभूमीची निर्मिती व जतन करणे आवश्यक असते. यामध्ये दर्जेदार सातत्य राखण्यासाठी 'ब्रॅण्ड मॅनेजमेंट'ची नेहमीच गरज असते.

**विक्री-नियोजन व्यवस्थापक :** विविध प्रसंग, सणवार एवढेच नव्हे, तर ऋतू-कालमानानुसार तयार कपड्यांचे उत्पादन व त्याच्या वितरण-विक्रीचे नियोजन करावे लागते.

**मागणी-पुरवठा विभाग व्यवस्थापक :** कपड्यांची प्रत्यक्षात होणारी विक्री, चोखंदळ ग्राहकांची पसंती, विशिष्ट प्रकारच्या मालाला मिळणारा प्रतिसाद या साऱ्यांचा अभ्यास करून, पुरवठाविषयक धोरण आखून, त्याची नियोजनबद्ध स्वरूपात अंमलबजावणी करणे.

**ऑनलाईन विक्री-व्यवस्थापन :** सध्याच्या परिस्थितीत भौगोलिकदृष्ट्या दूरवरच्या ग्राहकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी 'ई-कॉमर्स' पद्धतीच्या माध्यमातून विक्री व्यवसायाचे नियोजन व व्यवस्थापन करणे.

**कलाकुसरीसह काम करणाऱ्या उद्योजकांना प्रोत्साहन देणे :** तयार कपड्यांच्या उत्पादन-विक्री व व्यवस्थापनामध्ये नावीन्यपूर्ण व कलात्मकतेला सर्वाधिक वाव असतो. यामध्ये विविधता व सातत्य आणण्यासाठी छोटेखानी पद्धतीने, पण कलात्मक स्वरूपात कपडे तयार करणाऱ्या कारागीर-उद्योजकांना प्रोत्साहन व मार्गदर्शन करणे.

**आर्थिक विक्री व्यवस्थापन :** याशिवाय, तयार कपड्यांच्या वितरण-विक्री वाहतूक व व्यवस्थापनाद्वारे रोजगारनिर्मिती होऊ शकते.

तयार कपडे क्षेत्रात उपलब्ध असणाऱ्या विविध संधींचा करीअर-व्यवसाय वा उद्योजकता क्षेत्रात लाभ घेण्यासाठी विविध शैक्षणिक पात्रता व वयोगटांतील स्त्री-पुरुषांना संधी उपलब्ध होऊ शकते. उद्योजक म्हणून स्वतःचे वा आपल्या सहकाऱ्यांसह काम सुरू करायचे असल्याने मर्यादित भांडवलासह व्यवसाय सुरू करता येतो. मात्र, त्यासाठी संबंधितांनी आपल्या कौशल्याला कल्पक-कलात्मकतेची जोड दिल्यास प्रयत्नांती यश सहजशक्य होते. ■

**(लेखक एचआर व्यवस्थापन आणि सल्लागार आहेत.)**

९८२२८४७८८६

### पदपथ कोणासाठी ?

आपणास प्रत्येक ठिकाणी पदपथावर अनेक विक्रेते दिसतात. फळ, भाज्या, इतर वस्तूंचे ठेले लावलेले असतात आणि त्याभोवती वस्तू खरेदीसाठी ग्राहकांची असते. त्यामुळे पदपथावर चालणे अवघड होते. तसेच प्रत्येक ग्राहक पदपथावर आपले वाहन लावतो. रस्त्याच्या कडेला चारचाकी वाहने लागलेली असतात. चालणाऱ्या माणसाने रस्त्याने चालायचे कसे असा प्रश्न ज्येष्ठ नागरिकांना पडत आहे. चालताना दुसऱ्या माणसांचा किंवा वाहनाचा धक्काही ज्येष्ठ नागरिकाला लागतो. महानगरपालिकेने चालणाऱ्यासाठी पदपथ रिकामे ठेवण्याची सोय करावी. पदपथ हे वस्तू विक्रीसाठी नसून लोकांना चालण्यासाठी असतात हे सांगण्याची आता वेळ आलेली आहे. त्वरित महानगरपालिकेने दखल घेऊन पदपथावरील ठेले हटवावेत. तसेच वाहन पार्किंगची व्यवस्था नीट करावी. त्यासाठी फलक लावावेत. रस्त्यात कुठेही उभ्या असणाऱ्या वाहनचालकाला दंड करावा.

**व्यंकटेश देशमुख**/ ९७६२२६८८२२

### पुणे व्हावे हरित पुणे

पूर्वी पुणे पेन्शनरांचे जसे शहर होते, सायकलींचे शहर होते तसेच ते टेकड्यांचेही शहर होते. हवा शुद्ध होती. रहदारी कमी होती. प्रदूषण नावाला नव्हते. अनेक निवृत्तिधारकांचे स्वप्न असे की पुण्यात स्थायिक व्हावे. चतुःशृंगी टेकडी, हनुमान टेकडी, वेताळ टेकडी, पर्वती, तळजाई टेकडी या आणि अशा अनेक टेकड्यांनी पुणे शहर वेढलेले होते आणि आजही या टेकड्यांवरील वनराई संपूर्ण पुण्याला ऑक्सिजन पुरवते. लोकवस्ती वाढली आणि पुण्यातील या टेकड्यांच्या उतारावर बांधकामे वाढली. जुने पुणे ज्यांनी पाहिले आणि अनुभवलेले आहे त्या सर्वांना याची कल्पना येईल. पुण्यातील रस्त्यांवर व पुण्यातून बाहेर जाणाऱ्या प्रत्येक रस्त्यांवर दोन्ही बाजूंनी मोठमोठाले वृक्ष होते. गणेशखिंड रस्ता, कात्रज रस्ता, सिंहगड रस्ता, पुणे-मुंबई रस्ता, नगर रस्ता या व अशा अनेक रस्त्यांवरील वृक्ष पांथस्थांना सावलीसोबतच ऑक्सिजनही देत होते. या रस्त्यांवरून जाताना अजिबात थकवा येत नसे. शेतकी महाविद्यालयाचा रस्ता आजही थंडावा देत आहे. मात्र अनेक रस्त्यांवर विकासाच्या नावावर पुण्यात प्रचंड वृक्षतोड झाली आहे. मे महिन्यात पुण्यावरून अहिल्यानगरकडे जाताना प्रकर्षाने जाणवले. या रस्त्यावर तर औषधालाही झाड दिसत नाही. सोलापूरकडे जाताना वडाचे मोठमोठे वृक्ष होते. अनेक चित्रपटात या रस्त्याची चित्रीकरणे झाली आहेत. अशीच स्थिती अनेक रस्त्यांवर आढळते. भर उन्हातून जाताना थोडा विसावा घ्यायचा म्हटले तरी साधी सावली मिळत नाही. नवीन रस्ता तयार करताना असो किंवा रस्ता रुंदीकरण करताना असो रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षारोपण बंधनकारक करावे. या पावसाळ्यात वृक्षलागवड योजना प्रभावीपणे राबवावी. अनेक सामाजिक संस्था झाडे लावण्याचे व त्यांचे संगोपन करण्याचे काम करीत आहे. या संस्थांना बळ देणे, त्यांच्या कामात सहभाग घेणे व आपलाही खारीचा वाटा उचलणे हे पुणेकरांचे कर्तव्य आहे. आपले पुणे स्वच्छ पुणे, सुंदर पुणे यासोबतच हरित पुणे अशी पुण्याची ओळख पुणेकरांना नक्कीच सुखावून जाईल.

**सुदाम कृष्णाजी विश्वे**/
पुणे. ९८६०५८६१४७

■■■

## वाचक पत्रे

### उद्धव ठाकरेंनी अन्य मंदिरांच्या मुक्ती आंदोलनात पुढाकार घ्यावा

रामनगर राममंदिरात रामरक्षा, भीमरूपी, गणपती, रामराय, मारुती यांच्या आरत्या झाल्या. शिवसैनिक मंदिरात पूर्णपणे शिस्तीत वागले. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे राममंदिरातील मूर्ती पाहून भारावून गेलेले दिसले. या मूर्ती शिवाजी महाराजांचे गुरू रामदास स्वामी यांच्या चाफळ मंदिरातील मूर्तींसारख्या आहेत. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गोविंदराव पुराणिक जयपूरला गेले असतानाच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक प. पू. श्रीगुरुजी पण तेथेच होते. श्रीगुरुजींनी या मूर्तींची निवड केली होती. हे राम मंदिर १९५८ला धरमपेठेतील तेव्हाच्या रामभक्तांनी लहान स्वरूपात बांधले. आज केवळ लोकसहभागातून सध्याचे भव्य स्वरूप प्राप्त झाले आहे. स्थापन झाले तेव्हाच्या मूर्ती अच्युत महाराजांचे शिष्य रामनगरचे राजाभाऊ देशपांडे यांच्याकडे आहेत.

सध्याच्या मूर्ती १९६५ साली स्थापित करण्यात आल्या आहेत. एक रामभक्त म्हणून माझी तुमच्या शिवसेनेकडून वैयक्तिक अपेक्षा आहे की आपण काशी विश्वनाथ मंदिर, श्रीकृष्ण जन्मभूमी मंदिर मुक्ती आंदोलनात पुढाकार घ्यावा. 'अयोध्या तो झांकी है, काशी, मथुरा बाकी है' हे सिद्ध करावे, अशी माझी विनंती आहे. ■

**रवि वाघमारे**/९९६००१८०३०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र **मालक, सोलापूर तरुण भारत मिडीया लिमिटेड** करिता, **मुद्रक, प्रकाशक** कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी प्लॉट नं. ए-३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर, ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत प्लॉट नं. ए- ३२ छत्रपती संभाजीनगर, इंडस्ट्रीयल को ऑप. सोसायटी, रेल्वेस्टेशन रोड, औरंगाबाद ४३१००५ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. **संपादक :** विजयकुमार माधवराव पिसे. / **कार्यकारी संपादक :** प्रशांत वसंतराव माने
E-mail - stbaurangabad@gmail.com, Mob : 8888847268

Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, published by MR.KULBHUSHANRAM RAMAKRISHNA TARE Printed at CHATRAPATI SAMBHAJINAGAR INDUSTRIAL CO OP SOCIETY, CHATRAPATI SAMBHAJINAGAR 431005.(Maharashtra) **Editor :** Mr.VIJAYKUMAR MADHAVRAO PISE. / **Exicutive Editor :** Mr. PRASHANT VASANTRAO MANE. E-mail : stbaurangabad@gmail.com Mobile : 8888847268.

# ‘स्वारातीम’ विद्यापीठाची ऐतिहासिक कामगिरी

## उस्मानिया विद्यापीठासाठी अत्याधुनिक माहिती व्यवस्थापन प्रणाली विकसित

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ जुलै -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने देशातील १०९ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या उस्मानिया विद्यापीठ, हैदराबादसाठी अत्याधुनिक ’विद्यापीठ माहिती व्यवस्थापन प्रणाली’ विकसित करून उच्च शिक्षण क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी नोंदविली आहे. ही प्रणाली १८ जुलै, २०२६ रोजी उस्मानिया विद्यापीठात अधिकृतपणे लोकार्पित करण्यात आली. या कामगिरीमुळे महाराष्ट्रातील दुसऱ्या विद्यापीठासाठी उद्योगमानक दर्जाची डिजिटल प्रणाली विकसित करणारे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ ठरले आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली हा सल्लागार प्रकल्प विद्यापीठाच्या तज्ज्ञ पथकाने यशस्वीपणे पूर्ण केला. प्रकल्पाचे नेतृत्व डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी आणि डॉ. रुपाली एस. जैन यांनी केले.

या यशाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. आमच्या तज्ज्ञ पथकाने जागतिक दर्जाची तांत्रिक क्षमता सिद्ध केली आहे. राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाला नवी ओळख मिळवून देणाऱ्या डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी, डॉ. रुपाली एस. जैन आणि संपूर्ण पथकाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. भविष्यातही विद्यापीठ अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे देशातील शैक्षणिक संस्थांना तांत्रिक सहकार्य देत राहील.

प्रकल्प प्रमुख डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी म्हणाले, उस्मानियासारख्या देशातील प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक विद्यापीठासाठी ही प्रणाली विकसित करणे आमच्यासाठी मोठे आव्हान होते. मात्र, कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी दाखविलेला विश्वास, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि विद्यापीठ प्रशासनाचे सहकार्य यामुळे हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करता आला. ही केवळ सॉफ्टवेअर निर्मिती नसून, उच्च शिक्षणातील डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

नव्याने विकसित करण्यात आलेली ही माहिती व्यवस्थापन प्रणाली उस्मानिया विद्यापीठातील शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान व कार्यक्षम बनविणार आहे. सर्व महत्त्वाची कागदपत्रे डिजिटल स्वरूपात एका क्लिकवर उपलब्ध होणार असून, शिक्षक, विद्यार्थी आणि प्रशासनासाठी कामकाज अधिक सुलभ होणार आहे.

या लोकार्पण सोहळ्यास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांच्यासह उस्मानिया विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. कुमार मोलुगरम, कुलसचिव प्रा. जी. नरेश रेड्डी, कुलगुरूंचे विशेष कार्याधिकारी प्रा. एस. जितेंदर कुमार नाईक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालक प्रा. सिरीशा तसेच सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राचार्य आणि गुणवत्ता हमी कक्षाचे सदस्य उपस्थित होते.

या ऐतिहासिक कामगिरीमुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने नवोपक्रम, डिजिटल उत्कृष्टता आणि स्वदेशी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर आपले वेगळे स्थान अधोरेखित केले असून, ’डिजिटल भारत’ आणि ’आत्मनिर्भर भारत’ या संकल्पनांना प्रत्यक्ष कृतीतून बळकटी दिली आहे.ही मांडणी वृत्तपत्रीय शैलीत असून, बातमीचा प्रवाह कायम ठेवत कुलगुरू आणि डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी यांची प्रतिक्रिया नैसर्गिकरित्या समाविष्ट करण्यात आली आहे.

# हाणेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात रेबीज लसीचा तुटवडा

**तभा वृतसेवा**
**हानेगाव, दि. २१ जुलै -**

देगलूर तालुक्यातील हाणेगाव येथे शनिवार दि. १८ रोजी एका संशयित पिसाळलेल्या कुत्र्याने परिसरातील अनेक नागरिकांना व भटक्या कुत्र्यांना तसेच जनावरांना चावा घेतल्याची अत्यंत दुर्दैव आणि गंभीर घटना येथे घडली आहे. या हल्ल्यामुळे संपूर्ण गावात व परिसरात तीव्र भीतीचे वातावरण पसरले आहे. एकाच दिवसात अनेकांना कुत्र्याने चावल्याने जखमी नागरिकांना उपचारासाठी तात्काळ हाणेगावच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात धाव घेतली असता तिथे पोचल्यावर त्यांना जी परिस्थिती दिसली अत्यंत गंभीर आहे. या गावाला कोणी वाली आहे की नाही?असा सवाल उपस्थित नागरीकांना पडला आहे.

गेल्या वर्षभरापासून या आरोग्य केंद्रात रेबीज प्रतिबंधक लस उपलब्ध नाही, ही अत्यंत लाजिरवाणी बाप समोर आली आहे. निवडणुका आल्यावर मतासाठी पुढारी दारात येऊन मोठमोठे आश्वासन देतात आणि पाच वर्षात एकदा ही आरोग्य केंद्रास भेट देत नाहीत मग लोकांना सुविधा कसे मिळणार असा सवाल नागरीक वर्गातुन होत आहे स्थानिक लोकनेते,पुढारी आज नागरिकांच्या या ज्वलंत समस्येवर पूर्णपणे मुग गिळुन गप्प का बसले? आहेत असा संतप्त सवाल आता हनेगावच्या जनतेतून विचारला जात आहे.येथील आरोग्य यंत्रणेचा कारभार रामभरोसे झाला आहे. नुकताच एका महिलेचा सर्पदंशाने मृत्यू ही झाला आहे येथील सुनिता सूर्यकांत पटणे वय ४७ या आपल्या सोयाबीन पिकात खुरपंनच काम करत असताना त्यांना विषारी सापाने दंश केला उपचारासाठी त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले परंतु योग्य उपचारा अभावी प्रकृती गंभीर असल्याने त्यांना औराद आणि नंतर बिदर येथे हलवले दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला .वेळेवर व योग्य उपचार न मिळाल्यामुळे गरीब रुग्णांना असा नाहक जीव गमवावा लागत असल्याने ग्रामस्थातून संताप व्यक्त होत आहेपरिसरातील जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या उदासीन प्रशासन व लोकनेत्यांनी लवकरात लवकर या गंभीर विषयाकडे बारकाईनं लक्ष द्यावे असे ग्रामस्थांतुन मागणी होत आहे.

## इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ साठी नोंदणी सुरू

**नांदेड**-महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई यांच्या निर्देशानुसार इंडिया स्किल्स कॉम्पिटिशन २०२६-२७ या देशातील प्रतिष्ठित राष्ट्रीय कौशल्य स्पर्धेसाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यातील पात्र युवक-युवतींनी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त डॉ. राजपाल कोल्हे यांनी केले आहे.राष्ट्रीय कौशल्य विकास परिषद यांच्या माध्यमातून दर दोन वर्षांनी आयोजित होणारी ही स्पर्धा व्यावसायिक शिक्षण व कौशल्य क्षेत्रातील गुणवंत युवक-युवतींना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य सादर करण्याची संधी उपलब्ध करून देते. स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांची निवड राज्यस्तर आणि राष्ट्रीय फेऱ्यांसाठी केली जाते. राष्ट्रीय स्तरावर यशस्वी ठरलेल्या स्पर्धकांना भारताचे प्रतिनिधित्व करत थीश्रवड्ज्ञळश्रश्री ऊेीशींळींळेप मध्ये सहभागी होण्याची संधी मिळते. स्पर्धा विविध कौशल्य क्षेत्रांमध्ये वैयक्तिक तसेच सांघिक स्वरूपात होणार आहे. बहुतांश कौशल्यांसाठी उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे. तर सायबर सुरक्षा, उद्योग ४.०, मेकॅट्रॉनिक्स, रोबोट प्रणाली एकत्रीकरण, स्वायत्त मोबाइल रोबोटिक्स, काँक्रीटचे बांधकाम कार्य आणि ड्रपवीलरशि ऋीवशपळपस या ढशरा ड्ज्ञळश्रश्री साठी उमेदवारांचा जन्म १ जानेवारी २००४ किंवा त्यानंतरचा असणे आवश्यक आहे.स्पर्धेसाठी जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावर निवड प्रक्रिया राबविण्यात येणार असून विविध उद्योग, क्षेत्रीय कौशल्य परिषदा तसेच व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थांच्या सहकार्याने स्पर्धेचे आयोजन करण्यात येईल.जिल्ह्यातील सर्व शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (खढख), पॉलिटेक्निक महाविद्यालये, अभियांत्रिकी महाविद्यालये, विद्यापीठे, शाळा, प्रशिक्षण संस्था, उद्योग तसेच कौशल्य विकासाशी संबंधित संस्थांनी पात्र उमेदवारांमध्ये या स्पर्धेबाबत जनजागृती करून त्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घरकुल लाभार्थ्यांची पिळवणूक थांबवा : मारोती दिवसे पाटील

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २१ जुलै -**

पंतप्रधान घरकुल आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलांच्या अनुदानाचा पुढील हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यासाठी किनवट पंचायत समितीतील संबंधित अभियंते व ऑपरेटर १५ ते २० हजार रुपयांची लाच मागत असल्याचा गंभीर आरोप शिवसेना तालुकाप्रमुख मारोती दिवसे पाटील यांनी केला आहे. या प्रकरणातील दोषींवर तात्काळ निलंबनाची कारवाई करून उच्चस्तरीय चौकशी करावी, अन्यथा शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.



निवेदनानुसार, घरकुलाचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर दुसरा ७० हजार रुपयांचा हप्ता तसेच अंतिम बिल मंजूर करण्यासाठी लाभार्थ्यांकडून १५ ते २० हजार रुपयांची मागणी केली जात आहे. पैसे न दिल्यास विविध त्रुटी काढून फाईल प्रलंबित ठेवली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे अनेक गरीब लाभार्थ्यांना वर्षभरापासून पंचायत समिती कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

तालुक्यातील अनेक गावांतील लाभार्थ्यांनी अशा प्रकारच्या तक्रारी केल्याचा दावा करत, घरकुल योजनेत गोरगरिबांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा आरोप मारोती दिवसे पाटील यांनी केला आहे. शासनाची महत्त्वाकांक्षी योजना स्थानिक पातळीवरील कथित भ्रष्टाचारामुळे बदनाम होत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अभियंते व ऑपरेटर यांच्यावर कठोर कारवाई करावी, तसेच रखडलेले अनुदान तातडीने लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. प्रशासनाने योग्य ती कारवाई न केल्यास किनवट पंचायत समिती कार्यालयासमोर शिवसेनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते आमदार अंबादास दानवे यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना पाठविण्यात आल्या आहेत.

## ग्रामोद्योग भरारी पुरस्कारासाठी अर्ज सादर करावेत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० जुलै -**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत ग्रामीण भागात उद्योग उभारून रोजगारनिर्मितीमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या उद्योजकांचा गौरव करण्यासाठी ‘ग्रामोद्योग भरारी पुरस्कार- २०२६’ या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी नामांकन अर्ज मागविण्यात आले आहेत.

शासकीय योजनांच्या माध्यमातून उद्योग उभारणी करून यशस्वी ठरलेल्या उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी ही पुरस्कार योजना राबविण्यात येत आहे. यंदा या पुरस्काराचे चौथे वर्ष असून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन पुरस्कार तसेच काही उद्योजकांना उत्तेजनार्थ पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.इच्छुक उद्योजकांनी नामांकन अर्ज www.mskvib.org या संकेतस्थळावरून डाउनलोड करावेत

## शासकीय ईबीसी मुलांचे वसतीगृहात प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० जुलै -**

मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतीगृह तथागत नगर, मालेगाव रोड नांदेड येथे सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी पुनर/नुतन प्रवेशासाठी द्वितीय फेरीसाठी १ ऑगस्ट ते १० ऑगस्ट २०२६ पर्यत अर्ज मागविण्यात येत आहेत. यानंतर आलेल्या अर्जाचा स्विकार केला जाणार नाही. अचूक व परिपूर्ण अर्ज स्विकारले जातील यांची पालक व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन मातोश्री शासकीय ईबीसी वसतीगृहाचे गृहप्रमुख यांनी केले आहे.

विहित कालावधीत परिपूर्ण पुर्न-प्रवेश/नुतन प्रवेशाचे अर्ज हे संबंधित विहित कागदपत्रासह स्विकारण्यात येईल. पुर्न-प्रवेश/नुतन प्रवेशाचे अर्ज कार्यालयात कार्यालयीन वेळेत १ ते १० ऑगस्ट २०२६ या कालावधीत सुट्टीचे दिवस वगळून मिळतील. या कालावधीत परिपूर्ण भरलेले अर्ज कागदपत्रासह स्विकारले जातील .

माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी साठी शिक्षण घेत असलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार निवासाची व भोजनाची विनामुल्य सोय करण्यात येणार आहे. प्रवेश अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख १० ऑगस्ट असून यानंतर आलेल्या अर्जाचा स्विकार केला जाणार नाही असे मातोश्री शासकीय ईबीसी वसतीगृह नांदेड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविली आहे.

# जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ जुलै -**

मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीच्या औचित्याने राज्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ अभियानाचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानुसार नांदेड जिल्ह्यात २२ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत विधानसभा मतदारसंघनिहाय समाधान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, प्रत्येक मतदारसंघासाठी कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा प्रशासनाने नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे.

महसूल विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने या समाधान शिबिरांमध्ये महसूल विभागाशी संबंधित विविध प्रलंबित प्रकरणांचा निपटारा, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, विविध दाखल्यांचे वितरण तसेच इतर शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती, अर्ज स्वीकारणे तसेच नागरिकांच्या अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी विविध विभागांचे अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्या विधानसभा मतदारसंघातील संबंधित समाधान शिबिरास आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा. तसेच प्रलंबित प्रकरणे व तक्रारींचे निराकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# एसजीजीएसच्या दोन विद्यार्थ्यांची लिनक्स फाऊंडेशन एलएफएक्स मेंटरशिपसाठी निवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २१ जुलै -**

श्री गुरू गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था (एस.जी.जी.एस.आय.ई. अँड टी.), विष्णुपुरी, नांदेड येथील संगणक विज्ञान व अभियांत्रिकी विभागाच्या अंतिम वर्षातील राहुल अत्राम आणि तुषार पटले या दोन विद्यार्थ्यांची जगभरातील अत्यंत प्रतिष्ठेच्या लिनक्स फाऊंडेशन एलएफएक्स मेंटरशिप प्रोग्राम २०२६ (टर्म-२) साठी निवड झाली आहे.या यांच्या निवडीबद्दल संस्थेच्या संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

एसजीजीएसअभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था नांदेड येथील राहुल अत्राम यांची क्लाऊड नेटिव्ह कॉम्प्युटिंग फाऊंडेशन (सीएनसीएफ) - रिस्क-फाइव्ह इंटरनॅशनल अंतर्गत रिस्क-फाइव्ह एक्स्टेन्शन्स लँडस्केप या प्रकल्पासाठी तर तुषार पटले यांची सीएनसीएफ - क्यूबएज अंतर्गत अल्टरनेटिव्ह फॉर आयपीटेबलमॅनेजर व्हाया एपीआयसर्व्हर रिडायरेक्शन या प्रकल्पासाठी निवड झाली आहे. या प्रतिष्ठित कार्यक्रमांतर्गत दोन्ही विद्यार्थी १२ आठवड्यांच्या आंतरराष्ट्रीय मेंटरशिपमध्ये सहभागी होणार असून, क्लाऊड-नेटिव्ह तंत्रज्ञान क्षेत्रातील जागतिक दर्जाच्या



ओपन-सोर्स तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष प्रकल्पांवर काम करण्याची संधी त्यांना मिळणार आहे. यासाठी त्यांना अमेरिकन डॉलर्स (अंदाजे २.८० लाख) इतके मानधनही प्रदान करण्यात येणार आहे.या त्यांच्या यशाबद्दल एसजीजीएस अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड चे नियमक मंडळाचे अध्यक्ष प्रशांत पौळ, नियमक मंडळाचे सदस्य अमोल महामुनी, बाबा सुखविंदर सिंघ, संजय लाठकर, सुरेश जोंधळे, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई चे संचालक तथा नियामक मंडळाचे सदस्य डॉ.प्रमोद नाईक, प्रा. डॉ विक्रम गद्रे, तसेच संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. संदीप मुंढे, संगणक अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख प्रा. अनंत बैनवाड, सर्व अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.

# शिवसेना अल्पसंख्यांक विभागाच्या भोकर विधानसभाध्यक्षपदी मोहम्मद बुऱ्हाण यांची नियुक्ती



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २१ जुलै -**

शिवसेना संघटना अधिक बळकट करण्यासह अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने शिवसेना अल्पसंख्यांक विभागाच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. या नियुक्ती सोहळ्यात मोहम्मद बुऱ्हाण अब्दुल मजीद यांची भोकर विधानसभा अल्पसंख्यांक अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

शिवसेनेचे नेते तथा विधान परिषदेचे गटनेते आमदार हेमंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्ती सोहळा पार पडला. शिवसेना अल्पसंख्यांक विभागाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार सईद खान यांच्या सूचनेनुसार तसेच शिवसेना भोकर विधानसभा नेते व कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक इंजि. विश्वंभर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड जिल्हाप्रमुख अनवर अहमद यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले.

यावेळी मोहम्मद बुऱ्हाण अब्दुल मजीद यांची शिवसेना (शिंदे गट)भोकर विधानसभा अल्पसंख्यांक अध्यक्ष, शेख मुकीद शेख जानीमिया यांची मुदखेड तालुका अध्यक्षपदी, तर सय्यद जब्बार सय्यद जाफर यांची भोकर तालुकाध्यक्ष, शेख समीर शेख जैनुद्दीन यांची मुदखेड शहराध्यक्ष आणि शेख इब्राहिम यांची भोकर शहराध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

कार्यक्रमाला शिवसेना भोकर तालुकाप्रमुख माधव पाटील वडगावकर,युवक तालुकाप्रमुख दर्शन पाटील डुरे, मुदखेड उपतालुकाप्रमुख बाळू पाटील मंगल, सचिन पाटील किन्हाळकर, राहुल चौदंते, शेख हकीम मुजीब भाई यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून संघटना अधिक सक्षम करण्यासाठी आणि अल्पसंख्यांक समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिवसेनेची विचारधारा व विकासाची भूमिका पोहोचविण्याचे आवाहन केले. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य करण्याची ग्वाही दिली.

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार असिफोद्दीन हुसानोद्दीन रा. नांदेड ता. जि. नांदेड यांनी मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र ०.३९.२५ हे. आर. या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) नुसार अकृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र ०.३९.२५ हे. आर. या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६ (३) नुसार अकृषक प्रयोजनासाठी झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपांतरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस जाहीररित्या कळविण्यात येते की, अर्जदार मोइनोद्दीन तुराबोद्दीन व इतर रा. नांदेड ता. जि. नांदेड यांनी मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र १ हे १६.६७ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) अन्वये झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबतचा विनंती अर्ज केलेला आहे.

तेंव्हा मौ. म्हाळजा जि. नांदेड येथील सर्वे नं. १६/१ क्षेत्र १ हे १६.६७ आर या जमिनीचे हैद्राबाद ईनाम निर्मुलने व रोख अनुदाने कायदा १९५४ चे कलम ६(३) अन्वये झालेले हस्तांतरण नियमीत करून भोगवटदार वर्ग २ चे भोगवटदार वर्ग १ मध्ये रुपांतर करणे बाबत कोणाचा काही आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत लेखी स्वरुपात या कार्यालयात कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप अर्ज सादर करावा.

विहीत मुदतीत कुणाचा आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी प्राप्त न झाल्यास सदरच्या रुपातरण प्रकियेस कुणाचाही आक्षेप नाही, असे समजण्यात येवून सदर प्रकरणात नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

तसेच सदर प्रकरणात विहीत मुदतीनंतर आलेले आक्षेप/उजर/तक्रार इत्यादी विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**उपजिल्हाधिकारी (सामान्य)**
**जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड**



लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १०० टक्के व्याजमाफीला तीन दिवसांची मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१ जुलै -**

शिवछत्रपती प्रतिष्ठान, शेंद (पश्चिम) लातूर शहर महानगरपालिकेने थकीत मालमत्ता कराचा एकरकमी भरणा करणाऱ्या नागरिकांसाठी जाहीर केलेल्या १०० टक्के व्याजमाफी योजनेस आणखी तीन दिवसांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे नागरिकांना २१ ते २३ जुलै या कालावधीत थकीत कर भरून या सवलतीचा लाभ घेता येणार आहे.

यापूर्वी ६ ते २० जुलै या कालावधीत थकीत कराचा एकरकमी भरणा करणाऱ्यांना व्याजशास्तीत १०० टक्के सवलत देण्यात आली होती. या योजनेला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला असून सुमारे ६,३०० मालमत्ताधारकांनी थकीत कराचा भरणा केला. मात्र, काही करदाते अद्यापही थकबाकीदार असल्याने आणि योजनेला मुदतवाढ देण्याची मागणी होत असल्याने महापौर जयश्रीताई सोनकांबळे, उपमहापौर स्नेहल उटगे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, सभागृह नेते विजयकुमार साबदे आणि विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनी प्रशासनाला मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी योजनेस तीन दिवसांची मुदतवाढ मंजूर केली.

महापालिकेच्या कर संकलन विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे.



### संक्षिप्त वृत्त...



### उजनीचे समाजसेवक मनसुर रुईकर यांना 'समाजरत्न' पुरस्कार

**औसा, दि.२१ जुलै -**

राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समितीच्या वतीने देण्यात येणारा 'समाजरत्न' पुरस्कार यंदा औसा तालुक्यातील उजनी येथील समाजसेवक मनसुर जरीबखान रुईकर यांना प्रदान करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथील भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद रिसर्च सेंटरमध्ये आयोजित सोहळ्यात मराठवाडा विभागाचे आरटीओ आयुक्त विजय काठोडे यांच्या हस्ते त्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. मुस्लिम विकास परिषदेच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय समाजकार्याची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी समितीचे पदाधिकारी तसेच मान्यवर उपस्थित होते.

### लातूरमध्ये वाहतूक नियमभंगाविरोधात विशेष मोहीम

**लातूर, दि.२१, जुलै -**

जिल्ह्यात वाढत्या रस्ते अपघातांना आळा घालून नागरिकांचा प्रवास सुरक्षित करण्यासाठी जिल्हा पोलीस दलाकडून वाहतूक नियमांची जनजागृती आणि नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत २६२ वाहनचालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. जिल्ह्यातील वाहतूक नियंत्रण शाखा आणि विविध पोलीस ठाण्यांच्या संयुक्त विद्यमाने १४ ते १९ जुलै या कालावधीत ही मोहीम राबविण्यात आली. वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यावर पोलीस प्रशासनाने भर दिला आहे. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## बळीराजाच्या नजरा आकाशाकडे..! दमदार पावसाची अद्यापही प्रतिक्षाच!

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

पावसाळ्याची सुरुवात होऊन आता जवळपास दिड महिना उलटूनही लातूर जिल्ह्यात अद्याप मोठा पाऊस झालेला नाही. नाही म्हणायला सुरुवातीला झालेल्या किरकोळ पावसाने काही शेतकऱ्यांनी खरीपाच्या पेरण्या उरकल्या, मात्र आता पावसाअभावी दुबार प्रेणीचेसंकट आ वासून उभे राहिले आहे.

त्यामुळे बळीराजाच्या नजरा आजही आकाशाकडे लागल्या असून दमदार पावसाची सर्वांना प्रतिक्षा आहे. मागच्या काही वर्षात सूर्य आग ओकत आहे. त्यामुळे उन्हाळ्यात जीवाची अक्षरशः काहिली झाली. तेव्हा नागरिकांना कधी एकदा असह्य उन्हाळा संपून पावसाळा सुरु होतो, असे झाले होते. एकदा का उन्हाळा संपला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. पावसाळा सुरु झाल्याबरोबर काही दिवस उलटून गेल्यानंतर का होईना पण दमदार पाऊस होईल, या आशेवर शेतकऱ्यांसह सामान्य नागरिकही होते. पाऊस आज पडेल, उद्या पडेल या आशेवर असलेल्या जिल्ह्यातील शेतकऱ्यांसह प्रत्येकाला



वरून राजाने गुंगारा दिला. नाही म्हणायला जिल्ह्याच्या काही भागात पाऊस झाला, परंतु तो जिल्हाभरात सर्वदूर झाला नाही. ज्या भागात पाऊस झाला, त्या भागातील पिके तग धरून आहेत. परंतु हीच स्थिती जिल्ह्यात सगळीकडे दिसून येत नाही. एकंदर परिस्थितीवरून आजमितीस खरीप हंगाम धोक्यात आला आहे, असे म्हटल्यास नवल वाटू नये. गेल्या चार पाच दिवसात आकाशात ढग मोठ्या प्रमाणात जमलेले पाहायला मिळतात. अनेकदा वातावरण असे निर्माण होते की, थोड्याच वेळात जोरदार पाऊस सुरु होईल. परंतु थोडासा सडा टाकल्याप्रमाणे पावसाचे चार थेंब पडतात आणि ढग निघून जातात. ढगाळ वातावरणामुळे वातावरणातील धगही बऱ्याच प्रमाणात वाढली आहे. हवामान विभाग आणि पंचांगातहीयेणाऱ्या काही दिवसात समाधान कारक पाऊस होणार असल्याचे दर्शविण्यात आले आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात वरुणराजाची कृपादृष्टी होण्याचे संकेत वर्तवले जात आहेत. हवामान विभागापेक्षा अनेक लोक आजही पंचांगांवर अधिक विश्वास ठेवून चालतात,असेही निर्दशनास आले आहे. काही का असेना, एकंदर परिस्थितीवरून बळीराजासह सामान्य नागरिकांचाहीनजरा आकाशाकडे लागल्याचेदिसून येत आहे.

मोठ्या पावसाअभावी जिल्ह्यातील धरणातील पाणी पातळीही दिवसेंदिवस खालावत चालली आहे. आणखी काही दिवस वरुण राजाची कृपादृष्टी नाही झाल्यास पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## एसआयआर आणि शिक्षणाचा समतोल साधण्याची गरज!

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

विशेष सघन मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेसाठी शिक्षकांची मोठ्या प्रमाणावर नियुक्ती करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षण विभागाने शाळांची वेळ सकाळी ७.३० ते १२.३० अशी बदलली असून, बीएलओ नसलेल्या शिक्षकांनीही बीएलओंना मदत करावी, असे आदेश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात या आदेशांची अंमलबजावणी समान पद्धतीने होताना दिसत नाही.

ज्या शिक्षकांकडे बीएलओची जबाबदारी आहे, ते दुपारपासून सायंकाळपर्यंत मतदार यादीच्या कामात व्यस्त असतात. दुसरीकडे, बीएलओ नसलेले अनेक शिक्षक शाळा सुटल्यानंतर घरी जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे काही शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा ताण पडत असताना, काहींवर तुलनेने कमी जबाबदारी असल्याची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे एसआयआरचे काम सर्व शिक्षकांमध्ये समान पद्धतीने वाटून देण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे बदललेल्या शाळेच्या वेळेचा विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम. दुपारी शाळा सुटल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांच्या घरी पालक नसतात. परिणामी, काही विद्यार्थी अभ्यासाऐवजी वेळ वाया घालवत असल्याची तक्रार पालकांकडून होत आहे. याचा त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर आणि भविष्यातील जडणघडणीवर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याच पार्श्वभूमीवर एसआयआरचे काम शिक्षकांऐवजी इतर प्रशासकीय यंत्रणांकडे सोपविण्याची मागणी पुढे येत आहे. नगरपरिषद, महानगरपालिका, तहसील कार्यालयातील कर्मचारी किंवा इतर शासकीय यंत्रणांकडून हे काम करून घेता येईल, असा सूर व्यक्त होत आहे. काहींच्या मते, स्थानिक लोकप्रतिनिधींनाही या प्रक्रियेत जबाबदारी दिल्यास त्यांचा प्रभागाशी अधिक संपर्क वाढू शकतो.

शिक्षकांवर निवडणूक, जनगणना, सर्वेक्षण, विविध शासकीय मोहिमा अशा अनेक अतिरिक्त जबाबदाऱ्या वारंवार सोपवल्या जातात. शिक्षक ही कामे प्रामाणिकपणे पार पाडत असले तरी त्याचा परिणाम अध्यापनावर होतो, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करता येणार नाही.

शिक्षकांचे मुख्य कार्य म्हणजे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आणि भावी पिढी घडविणे. त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होणार नाही, अशा पद्धतीने एसआयआर आणि इतर प्रशासकीय कामांचे नियोजन करण्याची गरज आहे.

शिक्षकांना अध्यापनासाठी अधिक वेळ मिळावा आणि प्रशासकीय कामांसाठी पर्यायी यंत्रणा उभी करावी, अशी अपेक्षा अनेक पालक आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## वाचनसंस्कृतीच्या जनजागृतीसाठी पुणे-आळंदी-पंढरपूर सायकलवारीचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

माणूस प्रतिष्ठान संचालित माझं घरच्या पुढाकाराने वाचनसंस्कृती, पर्यावरण संरक्षण, इंधन बचत आणि सायकल संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या पुणे-आळंदी-पंढरपूर सायकलवारीचा सोमवारी (ता. २०) समारोप झाला.

शरद झरे, डॉ. विनोद चव्हाण आणि डॉ. पवन चांडक यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या सायकलवारीत सहभागी सायकलपटूंनी मार्गातील नागरिक, विद्यार्थी व वारकऱ्यांमध्ये 'मोबाइलला सुट्टी, पुस्तकाशी गट्टी', 'वाचाल तर वाचाल', 'सायकल चालवा-इंधन वाचवा, आरोग्य जपा' तसेच 'झाडे लावा, पर्यावरण वाचवा' असे सामाजिक संदेश दिले. या उपक्रमात डॉ. भगवान केंद्रे, पांडुरंग मोरे, राहुल राठोड व अर्जुन कांबळे यांच्यासह अनेक जण सहभागी झाले. सायकलवारीचे विविध ठिकाणी उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.

समारोपावेळी सामाजिक जनजागृतीसाठी सायकलचा प्रभावी माध्यम म्हणून अधिक व्यापक वापर करण्याचा निर्धार सहभागी सदस्यांनी व्यक्त केला.

## शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या तक्रार निवारणावर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२१, जुलै -**

शिरूर अनंतपाळ नगरपंचायतीच्या तक्रार निवारण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे प्रकरण समोर आले आहे. परिसरातील तुडुंब भरलेल्या नालीची स्वच्छता करण्यासाठी नागरिक धनंजय देवंगरे यांनी २६ मे २०२६ रोजी तक्रार निवारण नोंदवहीत लेखी तक्रार केली होती. मात्र, संबंधित स्वच्छता निरीक्षकांनी तक्रारीवर '१८ मे २०२६ रोजी काम पूर्ण करण्यात आले' असा शेरा मारल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, प्रत्यक्ष स्थळाची पाहणी केली असता संबंधित नाली अद्यापही तुडुंब भरलेली असून तिची कोणतीही स्वच्छता झालेली नाही. विशेष म्हणजे, तक्रार नोंदविण्याची तारीख २६ मे असताना त्यापूर्वीच १८ मे रोजी काम पूर्ण झाल्याची नोंद करण्यात आल्याने तक्रार निवारण प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

तक्रारदाराने असा सवालही उपस्थित केला आहे की, जर

### नाली साफ केल्याची नोंद, प्रत्यक्षात नाली तुडुंब...

नालीची स्वच्छता खरोखरच १८ मे रोजी झाली असेल, तर अवघ्या आठ दिवसांत ती पुन्हा तुडुंब कशी भरली? या प्रकरणात वस्तुस्थितीची पडताळणी न करताच तक्रार निकाली काढल्याचा आरोप करण्यात आला असून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून सत्य परिस्थिती समोर आणावी तसेच संबंधित नालीची तातडीने स्वच्छता करावी, अशी मागणी धनंजय देवंगरे आणि परिसरातील नागरिकांनी केली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत स्वच्छता निरीक्षक प्रशांत झांबरे तसेच शिरूर अनंतपाळ नगरपंचायत प्रशासनाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

### मातोश्री वृद्धाश्रमात अन्नधान्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने गोसावी वूमेन्स विंग, लातूर यांच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमात अन्नदान, धान्य तसेच जीवनावश्यक किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले.

धार्मिक सणाचे औचित्य साधत समाजोपयोगी कार्य करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## पोषण आहार योजनेतील कथित ८५ हजारांच्या अनियमिततेप्रकरणी मुख्याध्यापक निलंबित

**तभा वृत्तसेवा**
**मुरूड, दि.२१, जुलै -**

लातूर जिल्ह्यातील मुरुड येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पारुनगर येथील शालेय पोषण आहार योजनेतील कथित ८५ हजार ०१३ रूपये आर्थिक अनियमिततेप्रकरणी मुख्याध्यापक हेमंत डी. जोशी यांना जिल्हा परिषद लातूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीणा यांनी निलंबित केले आहे. शिक्षण विभागाच्या चौकशी अहवालानंतर ही कारवाई करण्यात आली असून शिक्षण क्षेत्रात या निर्णयाची चर्चा सुरू आहे.

तत्कालीन शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तृप्ती अंधारे व शिक्षण विभागाच्या चौकशीत विद्यार्थ्यांच्या आवश्यकतेपेक्षा कमी प्रमाणात पोषण आहार तयार करणे, तांदूळ शिल्लक ठेवणे, शासनाची पूर्वपरवानगी न घेता ६०० विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक किलोप्रमाणे ६०० किलो तांदूळ वाटप करणे आणि पोषण आहार योजनेत ८५ हजार ०१३ रूपयांची कथित आर्थिक अनियमितता झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच शासनाची दिशाभूल केल्याचाही ठपका ठेवण्यात आला आहे.

तक्रारीमध्ये तांदळासह डाळी, कडधान्ये, खाद्यतेल, मसाले व इतर साहित्याच्या वापरात अनियमितता, स्काऊट-गाईड गणवेश वितरणातील कथित गैरव्यवहार, पालकांकडून अतिरिक्त रक्कम वसूल करणे तसेच विकास निधीच्या नावाखाली विद्यार्थ्यांकडून बेकायदेशीर वसुली केल्याचे गंभीर आरोप करण्यात आले होते. मुख्याध्यापकांकडे केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापक अशी दुहेरी जबाबदारी असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवरही परिणाम झाल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकरणी शिक्षण विभागाने यापूर्वी कारणे दाखवा नोटीस बजावून १३ एप्रिल २०२६ रोजी कथित अनियमिततेची ८५ हजार ०१३ रूपये रक्कम शासन खात्यात जमा करण्याचे आदेश दिले होते. मात्र, मुख्याध्यापकांनी संबंधित खर्च बचत गटामार्फत झाल्याचा खुलासा केला.

शाळेच्या शासकीय निधीची अंतिम जबाबदारी सचिव म्हणून मुख्याध्यापकांचीच असल्याचे स्पष्ट करत प्रशासनाने हा खुलासा फेटाळून लावला.

या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा ग्रामीण पत्रकार संघ, पत्रकार श्रीकांत टिळक आणि भीम क्रांती संघटनांनी केला होता. त्यांच्या तक्रारीनंतर महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्या स्तरावर पत्रव्यवहार झाला. शासनाच्या निर्देशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीणा यांनी निलंबनाची कारवाई केली.

मुख्याध्यापकांच्या निलंबनानंतर या प्रकरणाची विभागीय चौकशी होण्याची शक्यता असून आणखी गंभीर बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, प्राथमिक चौकशीपासून निलंबनाच्या निर्णयापर्यंत सुमारे सहा महिन्यांचा कालावधी लागल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि वेळबद्ध चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## मूलभूत सुविधांसाठी आर्वी गायरान पुनर्वसितांचा महापालिकेवर ठिय्या; थाळीनाद आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

रेल्वे पटरीलगतच्या परिसरातून सुमारे २३ वर्षांपूर्वी आर्वी गायरान येथे पुनर्वसित करण्यात आलेल्या नागरिकांना अद्यापही मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या नसल्याच्या निषेधार्थ सोमवारी महिलांसह नागरिकांनी लातूर महानगरपालिकेच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन करत थाळीनाद केला.

महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात, नगरपालिकेने पुनर्वसन केल्यानंतरही पाणी, रस्ते, वीज, गटार यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या नसल्याचा आरोप करण्यात आला. तसेच, आर्वी ग्रामपंचायतीकडूनही संबंधित नागरिक लातूरचे मतदार असल्याचे कारण देत सुविधा दिल्या जात नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

आंदोलनाची सुरुवात आंबेडकर पार्क येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर थाळीनाद आंदोलनाने करण्यात आली. त्यानंतर नागरिकांनी मोर्चा काढून महापालिकेत धडक दिली. महापालिका आयुक्तांनी मागण्यांबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या आंदोलनात पँथर संघर्ष संघटनेचे संस्थापक ॲड. धम्मदीप बलांडे, शहराध्यक्ष नीलेश कांबळे, अशोक कांबळे, शीलरत्न गायकवाड यांच्यासह महिला व नागरिक सहभागी झाले होते.

## लातूरमध्ये २४ जुलै रोजी 'भक्तिरंग - एक संगीतमय वारी' कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त 'भक्तिरंग - एक संगीतमय वारी' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कार्यक्रम शुक्रवार, २४ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता दयानंद सभागृह, लातूर येथे होणार आहे.

संतवाणी, अभंग आणि भक्तिसंगीताच्या माध्यमातून विठ्ठलभक्ती, संतपरंपरा आणि वारकरी संस्कृतीचा सुरेल आविष्कार या कार्यक्रमातून सादर केला जाणार असून, लातूरकर रसिकांना भक्ती आणि संगीताचा अविस्मरणीय अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिरसपूर्ण सांगीतिक वारीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी केले आहे.

## आषाढी यात्रेपूर्वी डोंगरशेळकी रस्ता दुरुस्त करा; ग्रामस्थांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२१, जुलै -**

मराठवाड्याचे 'प्रति पंढरपूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या डोंगरशेळकी तीर्थक्षेत्राकडे जाणारा गंडी पाटी-डोंगरशेळकी-गुडसूर हा मुख्य रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत असून, आषाढी यात्रेपूर्वी त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामस्थ, वाहनचालक आणि भाविकांकडून होत आहे.

रस्त्यावर मोठमोठे खड्डे, उखडलेले डांबरीकरण आणि पावसामुळे साचणारे पाणी यामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत असून, या मार्गावर लहान-मोठे अपघातही घडत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. येत्या २५ जुलै रोजी डोंगरशेळकी येथे आषाढी यात्रा भरत असून, धोंडूतात्यांच्या दर्शनासाठी लाखो भाविक या मार्गाने येण्याची शक्यता आहे. मात्र, रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे भाविकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी करण्यात येत असली तरी संबंधित विभागाकडून अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

## आरी मोड-शिरूर अनंतपाळ रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य!

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२१, जुलै -**

तालुक्यातील आरी मोड ते शिरूर अनंतपाळ शहराला जोडणारा सुमारे चार किलोमीटरचा मुख्य रस्ता मोठमोठ्या खड्ड्यांमुळे धोकादायक बनला असून, या मार्गावर अपघातांची मालिका सुरूच आहे. त्यामुळे रस्त्याची तातडीने डागडुजी करून कायमस्वरूपी दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

विशेषतः घरणी प्रकल्पाच्या कालव्यापासून शिरूर अनंतपाळ शहरापर्यंत रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. खड्डे चुकविण्याच्या प्रयत्नात वाहनांची समोरासमोर धडक होत असून, अनेक नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. वारंवार अपघात होत असतानाही संबंधित ठेकेदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही ठोस उपाययोजना न केल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

### अपघातांच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या दुरुस्तीची मागणी

आरी मोड ते देवणी तालुक्यातील लासोना दरम्यान दोन पदरी सिमेंट रस्त्याचे काम सुरू असले तरी कामाची सुरुवात देवणीकडून करण्यात आल्याने आरी मोड-शिरूर अनंतपाळ हा



महत्त्वाचा टप्पा दुर्लक्षित राहिला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना सिमेंट नाल्यांचे काम पूर्ण झाले असले तरी रस्त्यावरील खड्ड्यांची दुरुस्ती अद्याप करण्यात आलेली नाही. या मार्गावर तहसील कार्यालय, पंचायत समिती, सार्वजनिक बांधकाम विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, तालुका कृषी कार्यालय आणि ग्रामीण रुग्णालय असल्याने दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिकांची वर्दळ असते. तसेच लातूर, निलंगा, नळेगाव आदी भागांतून शेकडो वाहने या मार्गाने प्रवास करतात.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, सार्वजनिक बांधकाम विभागात कायमस्वरूपी अधिकारी नसल्याने तालुक्यातील अनेक रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. प्रभारी अधिकाऱ्यांकडूनही या समस्येकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

वाढते अपघात रोखण्यासाठी आरी मोड-शिरूर अनंतपाळ रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

### कातपूर येथे उद्योग योजनांची जनजागृती

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.२१, जुलै -**

विलासराव देशमुख फाउंडेशनच्या वतीने कातपूर येथे जिल्हा उद्योग केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उद्योग व स्वयंरोजगार योजनांची जनजागृती करण्यात आली.

राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अदितीताई अमित देशमुख यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमास संगीता मोळवणे, उपसरपंच मनोज देशमुख, गजानन बोयणे, सोमनाथ कावळे यांच्यासह कातपूर परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## डॉक्टरांचा सल्ला आणि होम हेल्थकेअरच्या उपलब्धतेत वाढ

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर मध्ये पावसाळा सुरू झाला असून या काळात डेंग्यू, मलेरिया, ताप आणि इतर संसर्गजन्य आजार सामान्यतः वाढतात. याच पार्श्वभूमीवर स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेड या भारतातील आघाडीच्या स्वतंत्र आरोग्य विमा कंपनीने राज्यभरात आपली पावसाळी आरोग्य सेवा मोहीम अधिक तीव्र केली आहे. स्टार हेल्थच्या आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या महाराष्ट्रातील आकडेवारीनुसार, ताप आणि संसर्गजन्य आजारांसाठी होम हेल्थकेअर सेवेचा वापर करणाऱ्यांच्या संख्येत पाच पटीने वाढ झाली आहे. या वाढीसोबत, कंपनीने देशभरात नुकत्याच सुरू केलेल्या व्हर्च्युअल ओपीडी सेवेलाही अभूतपूर्व मागणी मिळाली आहे, ग्राहक वैद्यकीय सल्ल्यासाठी पहिली पायरी म्हणून या सेवेला मोठ्या प्रमाणावर पसंती देत आहेत.

## एडलवाइस लाइफचा 99.31% क्लेम सेटलमेंट रेशो

**मुंबई:** एडलवाइस लाइफ इन्शुरन्सने आर्थिक वर्ष 2026 मध्ये आजवरचा सर्वाधिक 99.31% क्लेम सेटलमेंट रेशो नोंदवला असून, सलग चौथ्या वर्षी हा रेशो 99% पेक्षा जास्त राहिला आहे. कंपनीने शून्य क्लेम प्रलंबितता देखील साध्य केली आहे, म्हणजेच आर्थिक वर्षात प्राप्त झालेला प्रत्येक क्लेम निकाली काढण्यात आला. यातून ग्राहक आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या गरजेच्या क्षणी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची विमा कंपनीची बांधीलकी पुन्हा एकदा अधोरेखित होते. क्लेम सेटलमेंट रेशो हा एकूण प्राप्त क्लेम्सपैकी दिलेल्या मृत्यू दाव्यांची टक्केवारी मोजतो आणि पॉलिसीधारकांप्रती दिलेली वचनबद्धता पाळण्याच्या विमा कंपनीच्या क्षमतेचा हा एक अत्यंत महत्त्वाचा सूचक मानला जातो. एडलवाइस लाइफ इन्शुरन्सचे एमडी आणि सीईओ सुमित राय म्हणाले, "जीवन विमा हा विश्वासावर आधारित असतो, कारण त्याचे मूल्य खरेदीनंतर अनेक वर्षांनी सिद्ध होते. हे पॉलिसीधारकाने आपल्या प्रियजनांना दिलेल्या वचनाचे प्रतीक आहे आणि त्यांच्या आकांक्षा अबाधित राहाव्यात यासाठी हे वचन पूर्ण करणे, हा आमच्यासाठी सर्वोच्च सन्मान आहे. हा आकडा जलद, काळजीपूर्वक आणि पारदर्शक पद्धतीने खऱ्या हक्कमागण्यांची पूर्तता करण्याच्या आमच्या बांधीलकीचा प्रतिबिम्ब आहे."

## 'सस्टेनेबल सिटीज चॅलेंज' अंतर्गत वाराणसीने विजेत्यांची घोषणा केली

**छत्रपती संभाजीनगर :** वाराणसी महानगर निगम यांच्या नेतृत्वाखाली, टोयोटा मोबिलिटी फाउंडेशन (टीएमएफ), चॅलेंज वर्क्स आणि डब्ल्यूआरआय इंडिया यांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या सस्टेनेबल सिटीज चॅलेंज (एससीसी) वाराणसी उपक्रमाच्या विजेत्यांची घोषणा करण्यात आली आहे. या उपक्रमाअंतर्गत वाराणसी आता आपल्या ऐतिहासिक केंद्रभाग काशीमध्ये पादचारी वाहतूक, प्रवेशयोग्यता तसेच रहिवासी आणि पर्यटकांचा अनुभव अधिक चांगला करण्यासाठी नाविन्यपूर्ण गतिशीलता आणि गर्दी व्यवस्थापन उपाययोजनांचा विस्तार करणार आहे. सिटीडाटाडॉटएआय आणि निप्पॉन कोएई यांचे सिटी फ्लो तसेच द अर्बनायझरचे जनजात्रा यांची विजेते म्हणून निवड करण्यात आली असून, जुन्या शहरात त्यांच्या उपाययोजनांचा विस्तार करण्यासाठी त्यांना आर्थिक तसेच सल्लागार स्वरूपाचे सहकार्य दिले जाणार आहे. वोगिक एआय चे बेहतर वे आणि प्रमेया कन्सल्टिंगचे नईचाल यांना वाराणसीतील अधिक सर्वसमावेशक आणि कार्यक्षम गतिशीलतेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल " ऑनरेबल मेंशन " म्हणून गौरविण्यात आले.

## निवासी छतावरील सौरऊर्जेच्या विस्ताराला पाठिंबा

**मुंबई:** भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीने, त्याच्या 'मिडास डील्स' या कौटुंबिक कार्यालयामार्फत, निवासी छतावरील सौरऊर्जा कंपनी 'सोलरस्क्वेअर'मध्ये गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक कंपनीच्या नुकत्याच जाहीर झालेल्या ५३ दशलक्ष डॉलर्सच्या 'सीरीज सी' निधी उभारणी फेरीचा एक भाग आहे. तो या कंपनीचा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणूनही काम पाहणार आहे. ही भागीदारी भारतातील निवासी छतावरील सौरऊर्जा बाजारपेठेच्या दीर्घकालीन वाढीवरील त्याचा विश्वास दर्शवते. धोनीची ही गुंतवणूक अशा वेळी आली आहे, जेव्हा भारतातील निवासी छतावरील सौरऊर्जा ही सर्वात वेगाने वाढणाऱ्या ग्राहक श्रेणींपैकी एक म्हणून उदयास येत आहे. विजेचा वाढता खर्च आणि स्वच्छ ऊर्जेसाठी ग्राहकांची वाढती पसंती यामुळे, अधिकाधिक घरमालक घरातील ऊर्जेचा खर्च व्यवस्थापित करण्यासाठी एक दीर्घकालीन उपाय म्हणून छतावरील सौरऊर्जेचा अवलंब करत आहेत. ही श्रेणी जसजशी वाढत आहे, तसतसे घरमालक अधिकाधिक अशा निवासी सौरऊर्जा कंपन्यांची निवड करत आहेत, ज्या सर्वसमावेशक उपाययोजना देतात.

## झी 5 ने सात भाषांमध्ये बहुभाषिक स्लेट सादर केली

**छत्रपती संभाजीनगर :** : मनोरंजन फक्त ट्रेंड्सचे अनुकरण करत पुढे जात नाही. ते स्वतः नवीन ट्रेंड्स निर्माण करून पुढे जाते. भारताचे सर्वात मोठे स्वदेशी व्हिडिओ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म, झी 5 ने नवीन पिढीच्या प्रेक्षकांसाठी खास तयार केलेल्या कथा, निर्माते आणि फॉरमॅट्सचे आपले आतापर्यंतचे सर्वात महत्त्वाकांक्षी बहुभाषिक प्रदर्शन सादर केले आहे. हिंदी, तमिळ, तेलुगू, मराठी, मल्याळम, कन्नड आणि बांग्ला भाषांमध्ये पसरलेला हा मंच मूव्हीज, सीरिज, लाईव्ह स्पोर्ट्स, एआय संचलित स्टोरीटेलिंग, ॲनिमेशन आणि किड्स एंटरटेनमेंटच्या व्यापक लाइन अपला एकाच ठिकाणी आणतो. मनोरंजन हे निडर, सांस्कृतिक मुळांशी जोडलेले आणि दुर्लक्षित करता येणार नाही असे असावे, या दृढ विश्वासावर आधारलेली ही नवीन स्लेट झी 5 चे दीर्घकालीन व्हिजन दर्शवते.










